पुणे, किशोर–वर्ष ५२, अंक ७ वा, जुलै २०२३ (मासिक) – किंमत रु.७/– पृष्ठे–५२.
Pune, Kishor - Vol.52, Issue 7, July, 2023 ( Monthly ) - Rs. 7 /- Pages -52

# किशोर

जुलै २०२३



# श्रावणातले दिवस

आबा गोविंदा महाजन

श्रावणातले दिवस
दिवस..कोवळे कोवळे
हिरव्या ओल्या बांधावर
सोन पिवळे पिवळे


श्रावणातले दिवस
दिवस..ओले ओले
सूर्यनारायण अलवार
केशर सांडीत गेले

श्रावणातले दिवस
दिवस..हिरवे हिरवे
झऱ्यांचे अलगुज
पाणंदीला नवे नवे

श्रावणातले दिवस
दिवस..सोनेरी सोनेरी
थेंबाचे माणिक मोती
सजले चंदेरी चंदेरी

श्रावणातले दिवस
दिवस..उल्हास उल्हास
जोंधळ्या रानाची
बळीवंताला आस

संपर्क : ९४२३४९२०८८



जुलै २०२३, वर्ष ५२ वे, अंक ७ वा, आषाढ-अधिक श्रावण, शके १९४५

# किशोर

संपादक :
कृष्णकुमार पाटील, संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

प्रकाशक :
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

निर्मिती अधिकारी :
हेमंत बाबर

अक्षरजुळणी : किशोर विभाग

कार्यकारी संपादक :
किरण केंद्रे

वितरण व्यवस्थापक :
जालिंदर पाटील

मुखपृष्ठ
सागरनाथ गायकवाड
संपर्क : ९८८१३४६२४३

चित्रांकन :
घनश्याम देशमुख, माईंडईट संवाद, धनश्री केळकर, चारुहास पंडित, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते, गणेश ढवळे, जैत्र डिजिटल, अमृता ढगे, योगिता धोटे

## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| श्रावणातले दिवस | आबा महाजन | ०२ |
| एकाची शिक्षा दुसऱ्याला नको | दिनेश काळे | ०६ |
| आकाशात | मनीष पाटील | ११ |
| रामभरोसे थापाड्या | श्रीकांत बोजेवार | १२ |
| एका पुतळ्याचा इतिहास | प्रा.डॉ.गणेश राऊत | १६ |
| निसर्गसृष्टी | रूपाली अवचरे | १९ |
| नटखट नाटू | यशवंत सुरोशे | २० |
| पाऊस थकूनी गेला | आश्लेषा महाजन | २३ |
| लबाड कोल्हा | शशिकांत काळे | २४ |
| कळ्या आणि थेंब कोठे बरं गेले...? | वैशाली सूर्यवंशी | २६ |
| ससा कासव | राजेश्वरी किशोर | २८ |
| करुणा | मनोज बोरगावकर | ३० |
| दत्त टेकडी | मंदा खांडगे | ३३ |
| हरोळी | माणिक पुरी | ३४ |
| कुतूहल | अमित डहाणे | ३८ |

**बालविभाग**

| | | |
|---|---|---|
| भावी आधारस्तंभ | | ४० |
| उमलती प्रतिभा | | ४२ |
| चित्रकथा | घनश्याम देशमुख | ४४ |
| ढगांची शाळा | सुनंदा भावसार | ४६ |

**ENGLISH SECTION**

| | | |
|---|---|---|
| Rainbow | Archana Sambarkar | ४७ |
| White Hills | Swapnali Amrutkar | ४८ |
| Puzzle | | ५० |


ऑनलाईन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनिऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,** सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४ संपादकीय : ०२०- २५७१६१०७, वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

## प्रिय किशोर

बालभारतीचे मोल काय ते
किशोर अंकाचे बोल काय ते
ओढ ती लागे किशोर अंकाची
लागे गोडी ती वाचनाची
जननी आमुच्या ज्ञानाची
छान–छान गाणी
कवितांची राणी
बोध कथा अन् गमतीजमती
किशोर अंक आम्हां सोबती
प्रेरित करते मनी भावना मैत्रीची
वाट पाहती गोपाळ सारे
येणाऱ्या किशोर अंकाची

डॉ. श्रीनिवास काळुंखे
संपर्क : ९४२३२९५८१६



हितगुज


# पाऊस पाडवा...

जुलै महिना म्हटलं की तुमच्या डोळ्यांसमोर काय येतं ? तुम्हांला काय आठवतं ते तीन अक्षरांमध्ये सांगा पाहू असं विचारलं तर तुमचं उत्तर काय असेल ? पाऊस... हो. अगदी बरोबर ओळखलंत तुम्ही! पाऊस म्हटलं की पांढरेशुभ्र धुके, स्वच्छ अंघोळ केलेली झाडे, भिजरी पायवाट, त्या पायवाटेच्या कडेने नव्याने उगवलेली इटुकली पिटुकली रंगीबेरंगी गवतफुले आणि सभोवताली जिकडे नजर जाईल तिकडे दिसणारी कोवळी, लुसलुशीत हिरवाई.. तुम्हांला तर होड्या, (यांचे तर किती प्रकार सांगावेत, साधी, डबल, नांगर, बंबी, शिडाची होडी) चिखल, घसरगुंडी, गजपानी, रस्त्यावरच्या डबक्यात जमा झालेला चहापाणी, पैसा, बेडूक, बगळे हे सुद्धा आठवतात ना ? शाळेत जर तुम्हांला माझा आवडता ऋतू असा निबंध किंवा भाषणाचा विषय दिला तर तुमच्यापैकी बरेच जण पावसावरच लिहितील, बोलतील! नाही का ? अगदी परीक्षेत प्रश्न विचारला तरीसुद्धा... इतका पाऊस तुम्हांला आवडतो. हो ना ? तुम्हांलाच नाही, तर असा हा पाऊस तुमचे आईबाबा, ताईदादा, शिक्षक, तुमच्या पुस्तकात छान छान गोष्टी लिहिणारे लेखक, लेखिका, सुंदर चित्र काढणारे चित्रकार, प्राणी, पक्षी, झाडे, वेली या सर्वांना देखील खूप खूप आवडतो बरं. लाडोबाच आहे त्यांचा.. सर्वांना आवडणारा हा पाऊस असतोच मुळी हवाहवासा असणारा..

या पावसोबाच्या येण्याची सर्वप्रथम चाहूल पक्ष्यांना लागते. चातक पक्ष्याचे आगमन होते आणि तो पिऊ पिऊ आवाजात साद घालू लागतो. पावशा पक्षी पेर्ते व्हा, पेर्ते व्हा असं म्हणत राहतो तर तित्तर पक्षी कोड्यानं केको असा आवाज काढत पावसाच्या येण्याची खुशखबर सर्व निसर्गाला मोठ्या आनंदाने सांगत सुटतो. जितक्या लवकर हे पक्षी पावसाची बातमी सांगतील तितक्या लवकर पाऊस आपल्या दारात येतो असं म्हणतात. पक्ष्यांना ही खबर लागताच ते आपापली घरटी बनवण्यास सुरुवात करतात, काळ्या मुंग्या आपली अंडी तोंडात घेऊन सुरक्षित जागा शोधून घाईघाईने इकडून तिकडे हालचाल करताना दिसतात. जंगलातले साप आणि बिळात राहणारे इतर प्राणी आपल्या बिळात पाणी शिरू नये म्हणून बाहेर पडतात आणि दुसरी सुरक्षित जागा शोधून निवांत आराम करतात. चिंचेच्या झाडांना फुलोरा येतो. रात्रभर झाडे काजव्यांनी फुलून येतात. पाऊस सुरू झाल्यावर बेडूकराव अचानक मातीखालून, तळ्याकाठच्या किंवा नदीकाठच्या चिखलातून टुणकन उडी मारून बाहेर येतात आणि डराव डरावचे समूहगीत सुरू करतात. मोर आनंदाने, बेभान होऊन थुई थुई नाचू लागतात. चिमण्या, साळुंक्या, सुगरण, वेडे राघू, खंड्या, भोरड्या, गाय बगळे, पाण कोंबड्या, मैना, कवडी मैना, भिंगऱ्या, शराटी, तित्तर, बुलबुल, नाचण, दयाळ, कोतवाल, शिंपी, वटवट्या, कोकीळ, भारद्वाज, सुभग, पोपट, हे आणि कित्येक पक्षी आपल्या किलबिलाटाने आसमंत दणाणून सोडतात. निसर्गातील हे सर्वच घटक पाहुणा म्हणून येणाऱ्या पावसाच्या स्वागताची आणि तो आल्यावर होणारा आनंद साजरा करण्याची मनःपूर्वक तयारी करतात. कधी रिमझिम, थेंब थेंब, टप टप टपोऱ्या तर कधी मुसळधार पावसाच्या पाण्याचे जणू गाण्यात रूपांतर होते. उन्हाने तापलेल्या मातीवर पडलेल्या पहिल्या पावसाचा मृदगंध तसेच केशर, जाईजुई आणि वेगवेगळ्या वेलींना सुटणारा कोवळा, मंद, सुवासिक गंध जणू हवेत अत्तर तरंगत असल्याचा आपल्याला अनुभव देतो. वारा आपल्या ओल्या झुळकीत हा सारा बेधुंद ओला सुगंध भरून साऱ्या निसर्गात अत्तर शिंपडत फिरत असतो. अवखळ ओढ्यांचा मंजूळ नि पावसाच्या थेंबांचा खुळ खुळ नाद ऐकू येतो. वारा नि पाणीही झुळझुळ गाणी म्हणू लागतात. त्यांना कोकीळ कुहूकुहू म्हणत अलवार साथ देते. जणू हिरव्याकंच रंगात मल्हार रागाची सुंदर मैफल सजते !

सारी सृष्टी आपली उबदार माया सर्वांवरती पसरवते. त्यातूनच झाडांमधून हिरवा मोरपिसारा फुलून येतो. जणूकाही 'पाऊस-पाडवा'... पावसाने आरंभ होणाऱ्या वर्षाचा पहिला दिवस या अर्थाने आपले श्रेष्ठ कवी बा. सी. मर्ढेकर यांनी आपल्या कवितेत 'उद्या येईन माघारा, उद्या पाऊस-पाडवा' असे म्हटले आहे. 'पाऊस-पाडवा' असा अप्रतिम शब्द म्हणजे मर्ढेकरांची मराठी भाषेला दिलेली मोठी देणगी म्हणता येईल. असा हा 'पाऊस-पाडवा' पाहण्याची, अनुभवण्याची नि साजरा करण्यासारखी गोष्ट आहे. मग काय तुम्हीही करताय ना साजरा पाऊस पाडवा...!

**किरण केंद्रे**
**कार्यकारी संपादक**



# एकाची शिक्षा दुसऱ्याला नको

दिनेश काळे

सूर्य उगवला आणि जंगलातील सारे पशू-पक्षी जागे झाले. चिमण्यांची चिवचिव, कावळ्यांची काव काव, कोकिळेची कुहूकुहू आणि वाघाची डरकाळी चहू बाजूने जंगलात घुमत होती. आता जंगलातील पहाट जरा वेगळीच वाटत होती. कारण जंगलातील वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम अवघ्या आठ दिवसांवर आले होते आणि जंगलातील सर्वच पशू-पक्ष्यांची सांस्कृतिक कार्यक्रमासाठी जय्यत तयारी सुरू होती. जंगलाचे राजे वाघोबांनी सर्वांना त्यांची कामे वाटून दिली होती आणि सांगितले होते की, ''कार्यक्रमाचं नियोजन योग्यरित्या झालं पाहिजे. काही कमतरता जाणवली तर तुम्हांला तुमच्या नैसर्गिक अधिकारापासून वंचित ठेवलं जाईल. त्यामुळे कोणीही कामात कुचराई करू नये आणि तसा विचार मनातही आणू नये.'' वाघोबा आपल्या मतावर ठाम असल्यामुळे जंगलातील वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रमाचं नियोजन कसं सुरू आहे ते बघायला म्हणून त्यांनी भल्या पहाटे जंगलाचा फेरफटका मारायला सुरुवात केली. वाघोबा दिसले किंवा समोर आले तर सर्व प्राणी त्यांना वाकून नमस्कार करीत असत. वाघोबा एकदा अचानक थांबले तेव्हा सारे प्राणी चालायचे थांबले. वाघोबांनी हळूच मागं वळून पाहिलं आणि समोर मान करीत म्हणाले,

''केवढा मोठा हा खड्डा! हत्तीदादा काय करतो तुमचा बांधकाम विभाग? ताबडतोब बुजवा हा खड्डा. कोणाचा पाय मोडला तर पंचाईत नाही का? बरोबर बोलतोय ना हत्तीदादा?''

''होय महाराज. आपण बरोबर बोलताय.''

''मग बुजवा याला.''

हत्तीदादा लगेच सोंडेतून मोबाईल बाहेर काढतात आणि नंबर लावतात.

''नदीच्या वळणावरचा खड्डा ताबडतोब बुजवण्यात यावा.'' आणि मोबाईल बंद केल्यावर,

''सांगितलं महाराज.''

''ठीक आहे.''

वाघोबा उडी मारून पुढे जातात तसं मग सारे प्राणीही तसंच करतात. वाघोबा जरा पुढे जात नाही तोच एका झाडावरून पेरूची फोड वाघाच्या अंगावर पडते. वाघोबा बघतात तर झाडावर माकड बसलेलं असतं. माकड झाडावर बसून पेरू खात होता. खाता खाता पेरूचा एक तुकडा वाघाच्या अंगावर पडल्यामुळे वाघोबा चिडले आणि म्हणाले,

''उतरवा त्याला खाली. खाता येत नाही या माकडाला, उतरवा त्याला खाली!''

वाघोबांचा राग बघून त्यांच्या सोबत असणाऱ्या साऱ्यांनी मग माकडाला आदेश दिला की,

''अरे, उतर खाली, वर काय बसलायस, वाघोबा काय म्हणालेत ते ऐकायला आलं नाही का?''

माकड फार घाबरलं. स्वप्नात कल्पना केली नव्हती असं विपरीत घडलं होतं. काय करावं तेच त्याला कळेना. तो लगेच खाली उतरला आणि वाघोबांपुढे येऊन उभा झाला आणि म्हणाला,

''क्षमा असावी महाराज, मला फार भूक लागली होती.''

''तुला भूक लागली होती. पण माझं अंग खराब झालंय ना.''

''झाली चूक त्याला काय करू?''

''गप्प बस रे माकडा, वाट्टेल ते बोलू नकोस, तुम्ही माकडं आता झाडावर बसता बसता डोक्यावर बसू नका. सांस्कृतिक मंत्री अस्वल समोर या.''

अस्वल समोर येऊन म्हणाले,

''बोला महाराज.''

''अस्वला, आजपासून माकडासोबत झाडावर

बसणारे सर्वच पक्षी झाडावरची गोड-गोड फळं खाणार नाहीत.''

''पण महाराज.''

''आता काय झालं?''

''झालं काही नाही, पण पक्ष्यांनी झाडावरची गोडगोड फळं खाणं हा त्यांचा नैसर्गिक अधिकार आहे. जंगलातील पक्ष्यांना आपण त्यांच्या नैसर्गिक अधिकारापासून वंचित करू शकत नाही.''

''अस्वला, तुम्हांला मी सांस्कृतिक मंत्री केलंय की कायदामंत्री?''

''सांस्कृतिक मंत्री...''

''मग कायदा मंत्र्याची भाषा वापरू नका. त्यांना त्यांचं काम करू द्या, तुम्ही तुमचं काम करा, नाहीतर तुमचं खातंच बदलून टाकीन.''

''नको महाराज.''

''नको ना! मग सांगतो तसं करा, आज संध्याकाळीच फर्मान काढा की, जंगलातील पक्षी झाडांवरील गोडगोड फळं खाणार नाहीत.''

''होय महाराज.''

''चला पुढं.''

आणि सारे जण वाघोबांच्या मागोमाग चालू लागले. माकड बिचारा मागेच राहिला. आपल्यामुळे सारे अडचणीत येणार असे त्याला वाटू लागले. दोन-तीन तास गेल्यावर साऱ्या जंगलातील पक्ष्यांना कळलं की संध्याकाळपासून जंगलातील पक्ष्यांनी झाडांची गोड-गोड फळं खायची नाहीत आणि हे कोणामुळे झाले तर एका माकडामुळे. त्यामुळे साऱ्याच पक्ष्यांना माकडाचा राग आला आणि ते सर्व जण त्याच्या घरी आले. कावळा म्हणाला,

''आता कशाला लपताय माकडोबा, जरा या की बाहेर.''

आपल्या घरासमोर जंगलातील सारे पक्षी एकत्र जमलेत ते बघून माकड बिचारे घाबरले. कारण माकड आधीच भित्रा प्राणी. आपल्यामुळे जंगलातील सारे पक्षी झाडांची गोड-गोड फळं खाऊ शकत नाही. ती जाणीव असल्यामुळे आपण जरा का घराबाहेर पडलो तर काही खरं नाही असा विचार करून माकड बाहेरच येईना. तेव्हा खारूताई म्हणाली,

''माकडोबा, तू बाहेर येतोस की आम्ही आत येऊ?''

नको नको म्हणत माकड घाबरतच बाहेर आले.

तेव्हा सारे पक्षी जरा गंभीर झाले. याचं काय करू आणि नको असं जेव्हा साऱ्यांचं झालं तेव्हा कोकीळ पक्षी म्हणाला,

''कशाला एवढं खातोस, जरा कमी खात जा. खाण्यावर जरा नियंत्रण हवं. 'अन्न तारी, अन्न मारी, अन्न विकार काढी', हे मी तुला अनेकदा सांगितलं तरी तुझं आपलं तेच. आज परत झाडावर बसून पेरू खात बसलास. खाता खाता पेरू वाघोबांच्या अंगावर पडला. परिणाम काय तर आता एकही पक्षी झाडांची गोड-गोड फळं खाऊ शकणार नाहीत. आणि हे केवळ तुझ्यामुळे झालं.''

''माकडोबा, तू वाघोबाची माफी माग.'' राघू पक्षी म्हणाला.

''राघू दादा, मी त्यांना विनंती केली पण वाघोबा ऐकायलाच तयार नाहीत.''

''माकडोबा, चूक तू केलीस मग तुझ्या चुकीची शिक्षा आम्हांला का?'' मैना रागाने म्हणाली.

''हो, हो. आम्हांला का?'' राघू जोरातच म्हणाला. आता मात्र माकडाची मोठी अडचण झाली. कारण एकही पक्षी ऐकायला तयार नव्हता. सारे माकडालाच दोष देत होते. आता आपली सुटका नाही असा विचार

करून माकडाने जी धूम ठोकली तो सरळ मग एका उंच झाडावर जाऊन बसला. तिकडे सारे पक्षी काळजीत होते. कारण त्यांना झाडांची गोड-गोड फळं खायची नाही असा आदेश होता. त्यामुळे पक्षी मिळेल ती कडू आणि आंबट फळे खाऊ लागली. एक-दोन दिवस झाल्यावर साऱ्यांना मग त्या कडू आणि आंबट फळांचा इतकी उबग झाला की, कधी आपली एकदाची यातून सुटका होते असे त्यांना वाटू लागले.

''पोपटा, तुझा आवाज छान आहे. तुझी चोच लाल आहे. तुझं मिठू मिठू पण छान आहे. कोकिळा मावशी तुझी कुहूकुहू तर अप्रतिम आहे. बाकी चिमणी, कावळा तुम्ही तर श्रेष्ठच आहात. कारण तुम्हांला आम्ही नेहमीच ऐकतो. चला एक मान्य करूया की माकडामुळे चूक झाली आणि वाघोबांनी तसा आदेश दिला. पण उद्यापासून तुमच्यापैकी कोणीही सकाळपासून तर रात्रीपर्यंत कोणताही आवाज काढायचा नाही. प्राण्यांच्या आवाजापेक्षा पक्ष्यांच्या आवाजात संगीत आहे आणि संगीत वाघाला खूप आवडतं. संगीताशिवाय त्यांच्या दिवसाला सुरुवात होत नाही. समजा, तुम्ही सकाळपासून तुमचा कोणताही आवाज काढला नाही तर जंगलात जो संगीताचा वर्षाव होतो तो होणार नाही. मग वाघोबा त्यांचे सल्लागार बैलोबांना विचारतील की, बैलोबा जंगलातलं संगीत कुठे हरवलं? आता बैल माझा चांगला मित्र आहे. त्याने काय बोलायचं ते मी त्याला सांगतो. अशी युक्ती आपण करूया, बघूया मार्ग निघतो का?'' डॉ.गाढव साहेबांनी जे सांगितलं ते ऐकून साऱ्या पक्ष्यांना आनंद झाला. इतका आनंद झाला की जणू काही उद्यापासूनच आपणास जंगलातील गोड गोड फळं खायला मिळतील असं त्यांना वाटू लागलं आणि मग त्याच आवेशात ते घरी गेले पण दुसऱ्या दिवशी अगदी पहाटेपासून एकाही पक्ष्याचा आवाज जंगलात ऐकू आला नाही. कारण पक्ष्यांनी हा संदेश जंगलातील सर्व पक्ष्यांना दिला होता. त्यामुळे सर्वच पक्ष्यांनी कोणताही आवाज न केल्यामुळे जंगलात संगीतमय वातावरणाची निर्मिती झाली नाही आणि तिकडे वाघाला जाग आली नाही. वाघोबा झोपेतून जागे झाले तेव्हा त्यांना आपण दुसऱ्या ग्रहावर तर नाही ना आलो! असे वाटू लागले. त्यांनी बाहेर डोकावून बघितलं तेव्हा सारं जंगल अगदी शांत वाटू लागलं. कोणत्याही पक्ष्यांचा आवाज ऐकू न आल्यामुळे मनाला प्रसन्न वाटत नव्हतं. त्यांनी त्वरित त्यांचे सल्लागार बैल यांना आपल्या दालनात बोलावून घेतलं आणि विचारलं,

''बैलोबा, हा काय प्रकार आहे. जंगलातलं संगीत कुठं हरवलं?''

त्यावर बैल म्हणाला.

''महाराज, जंगलातील साऱ्या पक्ष्यांचा आवाज खराब झाला आहे. झाडांची गोड-गोड फळं खायची नाहीत असा आपला आदेश आहे. तेव्हा ती बिचारी कडू आणि आंबट फळं खातात. त्यामुळे त्यांचा आवाज इतका खराब झाला की आठ दिवसांवर आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात ते गातील की नाही अशी शंका आहे.'' वाघोबा बसल्या जागेवरून उभे झाले. कारण संगीत त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग होता. संगीताशिवाय ते जगूच शकत नव्हते. संगीत नाही तर जीवनाला अर्थच नाही. कोकिळेची कुहूकुहू आणि बुलबुल पक्ष्याचा आवाज मनाला प्रसन्न करून जातो. एकाची शिक्षा दुसऱ्याला कशाला? माकडाने चूक केली त्यात पक्ष्यांचा काय दोष, वाघोबाला त्यांनी दिलेल्या आदेशाची तीव्रता लक्षात आली. खरं तर त्या आदेशाचा सर्वच पक्ष्यांवर परिणाम झाला होता ते म्हणाले,

''बैलोबा, आपलं काय मत आहे?''

‘‘वाघोबा, माकडाचं वर्तन चुकीचं आहे. त्याच्याकडून आपण दंड वसूल करू शकतो. पक्ष्यांचा काय दोष? एकाने केलेल्या चुकीची शिक्षा दुसऱ्याला कशाला? आणि वाघोबा मला एक माहीत आहे की निरपराध माणसाला शिक्षा होता कामा नये. माझं मत आहे की, आपण आपला निर्णय मागे घ्यावा.’’ तेव्हा वाघोबाने लगेच मान हलवून सांगितलं की, ‘‘आम्ही आमचा आदेश मागे घेतला. पक्षी आतापासूनच झाडांची गोड-गोड फळं खाऊ शकतील.’’ आणि काही मिनिटांत तो आदेश जंगलात वाऱ्यासारखा पसरला. पक्षी सारे खूश झाले. त्यांनी लगेच झाडांवरची गोड गोड फळं खायला सुरुवात केली. पण यामागे खरे श्रेय डॉ.गाढवाचे आहे तो विचार करून मग सारे पक्षी गाढवाकडे गेले. तेव्हा डॉ.गाढव म्हणाले,

‘‘कोणतंही काम युक्तीने करायचं असतं, शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ. आता माझं ऐका तुम्ही सारे वाघोबांकडे जा आणि त्यांचे आभार माना. डॉ.गाढवाने तसं म्हटल्यावर सारे पक्षी मग वाघोबांकडे गेलेत. त्यांच्या दालनात आल्यावर, कोकीळ म्हणाला,

‘‘वाघोबा, आम्ही तुमचे आभारी आहोत. नाहीतर आमचा आवाज खराब झाला असता. आम्हांला गाता आलं नसतं.’’

‘‘पक्ष्यांनो, माझंच चुकलं, मी एकाची शिक्षा दुसऱ्याला दिली. चूक केली माकडाने मग त्याची शिक्षा तुम्हांला का?’’

‘‘महाराज, झाली माकडाच्या हातून चूक, पण तो म्हणाला की अशी चूक पुन्हा होणार नाही.’’ कोकीळ पक्षी म्हणाला.

‘‘मला एक सांगा; माकडाचा सांस्कृतिक कार्यक्रमात काही सहभाग आहे का? की उगाच झाडावर बसून आपली गोड गोड फळं खातो.’’

‘‘नाही महाराज, त्याचा अजिबात सहभाग नाही. आळशी आहे. सारखा झोपून असतो.’’ पोपट म्हणाला.

‘‘असं का? मग त्याला आता एकच शिक्षा आहे की तुमच्या संगीतावर त्याने नृत्य करायचं. सांस्कृतिक महोत्सवात माकड नाचेल असं जाहीर करून टाका. हीच त्याला आता शिक्षा. नाही नाचला तर बघ म्हणावं. वाघोबा असं बोलून गेल्यावर साऱ्या पक्ष्यांना आनंद झाला. वाघोबांचा निरोप सांगायला सारे पक्षी मग उडतच माकडाकडे निघाले.

**संपर्क : ९३०९८७१७४५**





# आकाशात

मनीष पाटील


आकाशाच्या कागदावर
ढग काढतात चित्र
त्यात रंग भरतो
नभीचा मित्र

आकाशात खेळतो
ढग काळा काळा
त्यात पाणी भरतो
सागर निळा निळा

आकाशात राहतो
जादूचा चांदोबा
रोज रोज वाढतो
होतो वाटोळा

आकाशात फुलतात
चांदण्यांची फुले
जशी धरतीवर
नाचतात मुले!

संपर्क : ९९२००४२४४१



भाग–७

# रामभरोसे

## ‘थापाड्या’

भाग–१

श्रीकांत बोजेवार

डोकं हलकं झालेला राम्या आणि त्याची आई घरी आले. आईनं त्याला समोर बसवलं आणि म्हणाली, ‘‘राम्या, अरे तुझ्या अक्कल हुषारीमुळे तुला राजानं एवढी चांगली नोकरी दिली. ती नीट करायची सोडून, तू कशाला नको त्या भानगडी करत राहतोस?’’ डोकं हलकं झाल्यामुळे हायसं वाटत असलेला राम्या म्हणाला, ‘‘आता मी नक्कीच काळजी घेईन आई. मी धडा शिकलो आहे आता. नाक लांब झालं होतं, कान लोंबकळले होते, डोक्यात हवा गेली होती, आता बास झालं, मी अगदी शहाण्यासारखा वागेन आता.’’ आईला समाधान वाटलं. राम्याला बरं वाटावं म्हणून तिनं त्याच्या आवडीचं वांग्याचं भरीत आणि भाकरी केली.

राम्या रोज सकाळी पारावर जात होता, तक्रारी ऐकत होता, निवाडे देत होता. कुठल्याही अवगुणाला, वाईट सवयींना अजिबात थारा द्यायचा नाही हा निश्चय त्यानं ढळू दिला नाही. पण राम्या उर्फ रामभरोसेचा मूळ स्वभाव हळूहळू डोकं वर काढू लागला होता. अवगुणांच्या आहारी जाण्यासाठी त्याचं मन जणू आतुर झालं होतं. एक दिवस तो काम संपवून घरी जात होता, तेव्हा त्याला रस्त्यात एका ठिकाणी काही लोक गोळा झालेले दिसले. राम्या थांबला आणि काय झालं याची त्यानं चौकशी केली. एक जण म्हणाला, ''गावात कोल्हा आला आहे, आत्ता आमच्यासमोरच तो धावत आला आणि या झुडपात शिरून लपून बसला तो.'' ते ऐकल्यावर राम्यानं गंभीर संकटात पडल्यासारखे भाव चेहऱ्यावर आणले आणि 'हूं...अस्सं होय' म्हणून गप्प बसला.

सगळे उत्सुकतेने त्याच्याकडे पाहू लागले. तो पुढे काहीच बोलत नाही हे पाहून एकानं त्याला विचारलं, ''काय रं राम्या, एवढा कसला विचारात पडला आहेस?''

राम्या म्हणाला, ''मघाशी मला एक बिबट्या दिसला तिकडे झुडपात शिरताना. पण मला वाटलं की बहुधा मोठा कुत्रा असेल आणि मला बिबट्याचा भास झाला असेल. पण आता लक्षात आलं, त्या कोल्ह्याचा पाठलाग करत तो जंगलातून गावात आला आहे. आता तो कोल्हा इथं लपून बसलाय आणि बिबट्या तिकडे. आपण आपलं घरी जावं, बिबट्याला भूक सहन झाली नाही तर आपल्यापैकीच एखाद्यावर झडप घेईल तो.''

राम्याचं बोलणं ऐकून लोक घाबरून भराभर पांगले. राम्या स्वतःशीच हसत घराकडे निघाला. थोड्या वेळाने राम्याच्या मनाने राम्यालाच प्रश्न विचारला–



## बेभरवशा रामभरोसे

''राम्या, तू खरंच बिबट्याला पाहिलं होतंस?''

राम्या म्हणाला, ''नव्हतं पाहिलं.''


मन म्हणालं, ''मग खोटं का बोललास?''

राम्या म्हणाला, ''बोललो खरं मी खोटं, पण त्यानं कुणाचं काही नुकसान झालं का?''

मनाला ते काही पटलं नाही. पण मन गप्प बसलं आणि राम्या 'कशी मजा आली' म्हणत घरी निघाला.

दुसऱ्या दिवशी राम्याला कळलं की त्या कोल्ह्यानं बाळा सुताराच्या दोन कोंबड्या पळवल्या रात्री. याचा अर्थ कोल्हा खरंच आला होता. राम्यानं सांगितलेला बिबट्या आपल्यावर अचानक हल्ली करील म्हणून दोन दिवस कुणीही गावकरी त्या परिसरात फिरकला नाही. पण हळूहळू सगळ्यांची भीती कमी झाली. कोल्ह्याच्या पाठोपाठ बिबट्याही जंगलात निघून गेला असेल याची सगळ्यांना खात्री पटली. राम्याची थाप पचून गेली. राम्याची भीड चेपली.

पुढच्या आठवड्यात गावातील तळ्यात कमळं फुलली. तलावाचा रंगच जणू गुलाबी झाला. लोक कौतुकानं तलाव बघायला येत होते. काही तरुण तिथं जमले होते, त्यातला एक म्हणाला, ''काल मी मध्यरात्री



इथं आलो होतो. चंद्राच्या प्रकाशात, शांत वातावरणात, मध्यरात्री हे तळं इतकं सुंदर दिसतं, जसा काही स्वर्गच.'' राम्यानं ते ऐकलं आणि म्हणाला, ''मी एक गंमत सांगतो, कुणाला सांगू मात्र नका तुम्ही.'' सगळे कान देऊन ऐकू लागले. राम्या म्हणाला, ''परवा पहाटे २ वाजता मला वाटलं की बाहेर खूप प्रकाश पडला आहे, म्हणून मी घराबाहेर आलो. तर तलावाच्या बाजूनं प्रकाश येत होता. मी इथं आलो आणि काय दिसलं असेल?''

सगळ्यांनी उत्सुकतेनं विचारलं, ''काय दिसलं?''

राम्या म्हणाला, ''अर्ध शरीर माशाचं आणि अर्ध शरीर तरुण मुलीचं, अप्रतिम सुंदर अशी...''

सगळे चपापून म्हणाले, ''मत्स्यकन्या''

''हो, चक्क मत्स्यकन्या या कमळांनी भरलेल्या तलावात बागडत होती. तिच्या शरीराचा तो प्रकाश होता... मी खूप वेळ लपून पाहत होतो. पहाटेचा प्रकाश पडू लागला तेव्हा ती याच तळ्यात गडप झाली. काय सांगू मी तिचं सौंदर्य.. वेड लागेल वेड तिला पाहून.''

राम्याच्या भाग्याचा हेवा करत ते तरुण कल्पनेत रमले, तोवर राम्या तिथून पाराकडे निघाला होता. जाता जाता राम्याच्या मनानं त्याला विचारलं, ''कधी दिसली रे तुला मत्स्यकन्या?''

राम्या म्हणाला, ''कोण म्हणतं दिसली मला?''

''मग? खोटं का बोललास?'' मनानं विचारलं.

राम्या म्हणाला, ''ते सुंदर तळं पाहून मला कल्पना सुचली की या तळ्यात एखादी सुंदर मत्स्यकन्या नक्कीच असेल. मग मला वाटलं समजा ती आपल्याला दिसली असं सांगितलं कुणाला तर काय बिघडणार आहे?

कुणाचं काय नुकसान आहे त्यात?''

मन कळवळून म्हणालं, ''पण का? असं काही घडलंच नव्हतं तर कशाला एवढं रंगवून सांगायचं?''

राम्यानं मनाला उडवून लावलं आणि म्हणाला, ''माणसानं वेळ कसा घालवायचा? कुणाचं काही नुकसान होणार नाही अशी थाप मारली तर काय झालं मोठं?''

पण राम्याची ही थाप गावभर पसरली आणि गावातले तरुण तलावाच्या काठावर रात्री-अपरात्री येऊन मत्स्यकन्या कधी दिसेल याची वाट पाहू लागले. राम्याच्या नशिबाचा हेवा करू लागले. एवढ्या संख्येनं तरुण गर्दी करत आहेत, म्हणूनच ती पाण्यातून बाहेर येत नाही, असं म्हणत एकमेकांना दोष देऊ लागले. ''काय पोरं पण मूर्ख आहेत ना'' असं पुटपुटत राम्या स्वतःशीच हसू लागला. काही दिवसांनी कमळं कोमेजली, गर्दी कमी झाली. आता काही ती मत्स्यकन्या दिसणार नाही, म्हणत तरुणांनीही मध्यरात्रीच्या फेऱ्या बंद केल्या. राम्या मात्र आपली थाप पचली म्हणून खूश होता.

लवकरच गावातल्या तरुणांना मत्स्यकन्येचा विसरही पडला. आपण अशी काही थाप मारली होती हे राम्याही विसरुन गेला. त्याचे रोज पारावर जाणे, तक्रारी ऐकणे, निवाडा देणे सुरू होतेच. एका सकाळी राम्या पाराकडे जात असताना त्याने किस्न्या आणि तुक्या एकमेकांशी बोलत होते ते ऐकले. किस्न्या तुक्याला सांगत होता, ''माझ्या शेतात काय तरी येगळंच झाड उगवलं बघ, लाल रंगाची पानं आहेत आन् पिवळ्या रंगाची फुलं हाये. जांभळासारखं फळ लागलं हाय त्यास्नी.'' असं कोणतं झाड कधी पाहिलं नाही आपल्या भागात, म्हणून तुक्या ते ऐकून आश्चर्य व्यक्त करत होता.

राम्यानं हे ऐकलं आणि दोघांनाही थांबवलं. झाडाची उंची किती आहे, पानांचा आकार कसा आहे, याची उगाचच चौकशी केली आणि म्हणाला, ''किस्न्या, लेका तू नशीबवान आहेस.''

''यात कसलं आलंय नशीब?'' किस्न्या म्हणाला.

त्यावर राम्यानं त्याचे दोन्ही हात हाती घेतले आणि म्हणाला, ''चिनी देवांच्या पुराणातली एक कथा मी ऐकली होती. त्यात अशाच झाडाचं वर्णन होतं. एखाद्या गावातील शेतात हे झाड असंच अचानक उगवतं. ते गावासाठी खूप चागलं असतं, गावाची भरभराट होते त्यामुळे. ते झाड तुझ्या शेतात उगवलं म्हणजे बघ तू किती भाग्यवान आहेस.'' राम्यासारखा राजानं नेमलेला माणूस सांगतोय ते नक्कीच खरं असेल असं समजून किस्न्या खूश झाला. गावाची भरभराट होण्याचा शुभ संकेत आपल्या शेतात उगवावा याचा त्याला खूप आनंद झाला. हे झाड आता साऱ्या गावाला दाखवायला तो उत्सुक झाला.

दोघे निघून गेल्यावर राम्याच्या मनानं त्याला विचारलं, ''चिनी पुराण तू कधी वाचलंस रे?''

राम्या म्हणाला, ''कोणी वाचलंय पुराण? दोघाचं बोलणं ऐकून एक थाप सूचली ती ठोकून दिली मी.''

''पण त्या दोघांना ती खरी वाटली ना..''

''मग वाटू दे की, काय बिघडलं? लोक येतील, कौतुकानं बघतील गावाची भरभराट होईल म्हणून खूश होतील.''

''पण तरी थाप ती थापच ना?''

मनाच्या या प्रश्नाकडे राम्यानं साफ दुर्लक्ष केलं. गावातले अनेक जण किस्न्याच्या शेतात जाऊन बघत आहे हे कळल्यावर तो खूश झाला. आपली थाप पचली या आनंदात तरंगतच तो घरी गेला. (क्रमशः)

**संपर्क : ९८९२४१९२६७**

# एका पुतळ्याचा इतिहास

प्रा. डॉ. गणेश राऊत



आज शाळेने हेरिटेज वॉक आयोजित केला होता. हेरिटेज वॉक म्हणजे वारसादर्शन. एखाद्या शहरात खूप सारी ऐतिहासिक स्थळे असतात. ती ऐतिहासिक स्थळे प्रत्यक्ष जाऊन पाहणे व इतिहास समजून घेणे याला हेरिटेज वॉक म्हणता येईल.

पुणे शहरात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले यांच्या शिल्पांपासून सुरू झालेला हेरिटेज वॉक मंडईबाहेरील लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यापर्यंत पोहोचला. पुतळ्याशी पोहोचताच इतिहासाच्या शिक्षिका म्हणाल्या, ''पुतळेसुद्धा इतिहास सांगतात बरं का! आज मी तुम्हांला या पुतळ्याचा इतिहास सांगते. दरवर्षी पुणे शहरातील गणेश विसर्जनाची मिरवणूक येथूनच सुरू होते. हा पुतळा आहे 'लोकमान्य टिळकांचा' आणि या मंडईचे नाव आहे 'महात्मा फुले मंडई'. खरं म्हणजे या दोघांचाही या जागेत मंडई उभारण्यास विरोध होता. महात्मा फुले म्हणत होते 'ही मंडई उभारण्यास येणारा खर्च विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी द्या.' लोकमान्यांचा जुन्या जागेतून नव्या जागेत मंडई आणण्यास विरोध होता. या दोघांच्याही सूचनांचा विरोध करून इंग्रज सरकारने येथे मंडई उभारली आणि त्याला नाव दिले 'कर्नल रे मार्केट'. पुढे महात्मा फुले यांचे नाव मंडईला देण्यात आले. याच परिसरात पुण्यात ज्यांचे वक्तृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व फुलले त्या लो. टिळकांचा इथल्या मेघडंबरीत संगमरवरी पुतळा उभारण्यात आला. लो. टिळकांचा हा भारतातील पहिला संगमरवरी पुतळा होय.''

बाईंनी आजूबाजूला नजर टाकली. सकाळी खरेदी करायला आलेले पुणेकरसुद्धा या हेरिटेज वॉकमध्ये सहभागी झाले होते. सगळीकडे उत्सुकता होती. हा पुतळा उभारण्यात जेवढे विघ्ने आली तेवढी क्वचितच एखाद्या पुतळ्यासंदर्भात आली असतील. एवढ्यात सुधाकरने हात वर केला. सुधाकरचा प्रश्न – ''म्हणजे काय?'' ''अरे सांगते की. किती घाई!'' शिक्षिका म्हणाल्या.

''लोकमान्य १८९५ ते १८९७ च्या काळात पुणे नगरपालिकेचे सदस्य होते. निवडून आल्यावर ते पुणे नगरपालिकेच्या मॅनेजिंग कमिटीवर (व्यवस्थापन समिती) गेले. कायद्याचे पदवीधर असल्याने टिळक नगरपालिकेच्या सगळ्या कामांमध्ये सक्रिय होते. पुढे ते देशाचे नेते झाले. मंडालेहून सुटून आल्यावर पुणे नगरपालिकेने त्यांना मानपत्र देऊन त्यांचा सत्कार केला. पुणे नगरपालिका ब्रिटिश विरोधक असणाऱ्या भारतीय राष्ट्रीय नेत्याला प्रथमच मानपत्र देणार होती. असे करणे म्हणजे इंग्रज सरकारचा रोष ओढवून घेणे होते. परंतु, नगरपालिका ठाम राहिली.''

लोकमान्य दिवंगत झाल्यावर १७ ऑगस्ट १९२० रोजी पुणे नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत लोकमान्यांचा पुतळा उभारण्याचा ठराव मंजूर झाला. यासाठी त्या काळी १५ हजार रुपये खर्च मंजूर करण्यात येऊन शिल्पकारांस ६ हजार रुपये देण्यात आले. असे सगळे चालू असताना नगरपालिकेच्या अकाऊंटंटने या खर्चासाठी प्रांतिक सरकारची (मुंबई) परवानगी घेण्यास सुचवले. १९२२ मध्ये पुणे नगरपालिकेने पुतळा बनवण्यासाठी मुंबई सरकारची परवानगी घेण्याची गरज नाही अशी भूमिका घेतली. शिल्पकार विनायक व्यंकट वाघ यांना काम वेगाने पूर्ण करण्याची सूचना करण्यात आली.

अशातच १९२२-२३ मध्ये सरकारी हिशेब तपासनिसाने आर्थिक व्यवहार तपासून पुतळ्याचा खर्च नामंजूर केला. शिल्पकारांस दिलेली आगाऊ रक्कम

वसूल करण्यासाठी सरकारच्या वतीने जिल्हा कोर्टात दावा दाखल करण्यात आला. लो. टिळक हयात असताना त्यांच्यावर सरकार खटले भरतच होते. आता त्यांच्या पुतळ्यासंदर्भात खटला सुरू झाला. कोर्टाने पुतळा उभारण्याच्या खर्चावर बंदी घातली.

एवढ्यात शिल्पकार वाघ गव्हर्नर लॉर्ड हार्डिंग्ज याला भेटायला गेले. त्यांनी गव्हर्नरला निरोप पाठवला 'मला तुमचे शिल्प तयार करायचे आहे. मला फक्त दोन तास द्या.' एका भारतीयाची ही मागणी ऐकून लॉर्ड चक्रावला. इंग्लंडमधील प्रख्यात अशा 'रॉयल अकॅडमी ऑफ आर्ट' च्या प्रख्यात शिल्पकाराने म्हणजे हॅम्प्टनने आपला पुतळा चार तासात तयार केला होता. हॅम्प्टनला चार तास लागतात, हा भारतीय तर फक्त दोन तास मागतो! लॉर्ड तयार झाला. वाघांनी दोन तासात लॉर्डचे शाडूचे शिल्प तयार केले. ते इंग्रज कलावंतापेक्षा सरस होते. गव्हर्नर हार्डिंग्जने त्यांना आपले खासगी शिल्पकार नेमले. वाघांनी पुढे केवळ स्मरणशक्तीच्या जोरावर इंग्लंडचा राजा पंचम जॉर्ज याचे शिल्प एका तासात तयार केले.

आता पुणे नगरपालिकेच्या प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण झाला. ४ जुलै १९२४ च्या सर्वसाधारण सभेत नगरपालिकेचे प्रमुख आणि टिळकांचे विश्वासू सहकारी नरसिंह चिंतामणी उर्फ न. चिं. केळकर यांनी 'केसरी–मराठा ट्रस्ट' पुतळ्याचा सगळा खर्च उचलेल असे जाहीर केले. कोर्टात पुणे नगरपालिकेच्या बाजूने निकाल लागल्यास पैसे ट्रस्टला द्यायचे. निकाल विरोधात गेल्यास ट्रस्ट सगळा खर्च करेल असे ठरले. २२ जुलै १९२४ रोजी पंडित मोतीलाल नेहरू यांच्या हस्ते या पुतळ्याचे उद्घाटन झाले. यथावकाश कोर्टात केसचा निकाल लागला. निकाल पुणे नगरपालिकेच्या बाजूने लागला. पुणे नगरपालिकेची भूमिका योग्य ठरली. ब्रिटिश सरकार कोर्टात हरले.

गोष्ट एवढ्यावरच थांबत नाही. शिल्पकार वाघ यांचे चिरंजीव ब्रह्मेश वाघ भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे 'स्वीय शिल्पकार' झाले. त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सरदार पटेल यांची व्यक्तीशिल्पे घडविली. त्यांचे चिरंजीव विनय वाघ यांनी दक्षिण आफ्रिकेतील नेल्सन मंडेला आणि अमेरिकेत मेम्फॅसिस येथे महात्मा गांधी यांचे व्यक्तीशिल्प उभारले. शिल्पकारांच्या तीन पिढ्यांनी इतिहास घडवला.''

**संपर्क : ८४५९७७२०१८**

**'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक विवेक उत्तम गोसावी यांनी सोहेल एंटरप्रायजेस, सर्व्हे नं.४८, घर पट्टी नं.४०२, भांडार्ली व्हिलेज, नॅशनल काट्याजवळ, ठाणे–४०० ६१२ येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे–४११ ००४ येथे प्रसिद्ध केले. ✻ संपादक – कृष्णकुमार पाटील.**

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Textbook Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Vivek Uttam Gosavi, Printed at M/s. Sohail Enterprises, S.No. 48, Ghar Patti No. 402, Bhandarli Village, Near National Kata, Thane-400 612 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411 004. ✻ Editor - Krishnakumar Patil.**

# निसर्गसृष्टी

रूपाली अवचरे



जग बनवले कुणी
आई मला सांग
कुणी केली निर्माण
ही पर्वताची रांग?

इवले इवले पक्षी
उडती कसे आकाशी?
पाण्यामधली जलसृष्टी
दिसते आहे कशी?

निरनिराळी फुले
बागेची आहेत शान
विविध रंग सांग ना
कसे झाले निर्माण?

झाडे कुणी बनवली
कुणी बनवली फळे
वाऱ्यावर डोलणारे
कुणी फुलवले मळे?


प्रश्न किती तुझे हे
किती विचारतो बाळा?
त्यासाठी हवाच
निसर्गाचा लळा

या निसर्गसृष्टीचे
करू आपण जतन
नैसर्गिक समतोलाचे
करू सदा संवर्धन

संपर्क : ९८५०८८४१७५

# नटखट नाटू

यशवंत सुरोशे



“अरे नाटू, तुला किती वेळा सांगितलं की अगदी किनाऱ्याला जाऊ नकोस. इकडे आमच्यासोबतच रहा ना! तुझ्या बाबांना सवड असल्यावर तुला नेतील किनाऱ्याला!” नाटूची आई सुळकी मारत नाटूला समजावत होती. पुढे गेलेला नाटू युटर्न घेऊन मागे फिरला. आपल्या आईचं बोलणं जणू त्याने ऐकलंच नव्हतं.

''आई! आई! किनाऱ्याला गेलं की तिकडं पाणी कसं उबदार असतं. तिकडे बराच उजेडही दिसतो. मला आवडतं तिकडे फिरायला.'' नाटू रंगात येऊन सांगत होता.

''अरे बाळा! भरती आल्यावर पाण्यासोबत फार किनाऱ्याला जाऊ नये. तुझं वय लहान आहे म्हणून कदाचित तुला कोणी पकडणार नाही. मात्र तू सावध रहायला हवं. पाण्याच्या लाटेबरोबर जायचास तू वाळूवर! मला तर बाबा तुझी फार काळजी वाटते.'' नाटूची आई नाटूच्या मागे-मागे पोहत त्याच्याशी बोलत होती.

''आई! तू उगीच घाबरतेस. माझ्यासोबत आणखी काही दोस्त मंडळी असतात. मागच्या वेळेस बाबा माझ्यासोबत आले होते तेव्हा त्यांनी सांगितलं की ज्या ठिकाणी माणसांचा वावर असतो, पक्ष्यांचे थवे उतरलेले असतात, तिकडे नाही जायचे. बाबांनी मला काही जागाही दाखवल्या आहेत.'' नाटू आपलेच म्हणणे खरं करत होता.

''अरे बाळा! माहीत असून जीव संकटात कशाला घालायचा. तू आमच्यासोबत रहा. इथे खोल समुद्रातही फिरायला, पोहायला, सुळक्या मारायला मजा येतेच ना! फक्त कोळ्याच्या जाळ्यात फसायचं नाही!'' नाटूची आई आपल्या पराने नाटूला धक्का देत समजावत होती. नाटू हसत-हसत आईच्या पुढे पोहत निघाला. आई मागोमाग येताना पाहून नाटू गर्रकन वळायचा. डोक्यावरून जाणाऱ्या लाटेवर स्वार व्हायचा.

त्या दोघा मायलेकरांना शोधत नाटूचे बाबा आले. बाबांना पाहताच नाटूला भलताच उत्साह आला.

''बाबा! आज मी किनाऱ्यावर गेलो होतो. उबदार पाण्यात नि उजेडात पोहायला भारी मजा येते. बाबा! आज मी एक प्लॅस्टिकची बाटली पाहिली पाण्यावर तरंगताना! मी तिच्या खालून पोहलो. वर पाहिले तर आकाशातून येणारा उजेड त्या बाटलीतून पाहिला. किती रंगीत होता तो उजेड!''

नाटूचं बोलणं ऐकून त्याचे बाबा हसले. त्याला पोटाशी धरत ते सोबतीने पोहू लागले. बाप-लेकाचं जमलेलं मेतकूट पाहून नाटूच्या आईला खूप आनंद झाला.

''तरी बरं का नाटू! प्लॅस्टिकच्या वस्तूंपासून दूर रहायचं. या अशा वस्तूंमुळे आपला जीव धोक्यात येतो. आता तू मोठा होशील. सांभाळून रहा! चला! आपण काही खायला मिळतयं का ते पाहू या!'' असं म्हणत तिघेही अन्नाच्या शोधात खोल समुद्रात इकडेतिकडे सुळक्या मारू लागले.

मग दोन-तीन दिवसांनंतर नाटू पुन्हा आपल्या आई-बाबांना न सांगताच भरतीच्या लाटेबरोबर किनाऱ्याला गेला, तिथल्या उबदार, गढूळ पाण्यात पोहताना त्याला मजा यायची. किनाऱ्यावरील वाळूमुळे डोळे थोडे चुरचुरायचे. पण नाटू ते सहन करायचा. पोहता-पोहता त्याला परवाची ती बाटली दिसली. आता तिच्यात अर्धवट पाणी भरलं होतं. येणाऱ्या लाटेवर ती तरंगायची. पुढे जायची. लाट ओसरली की बाटली घरंगळत पुन्हा पाण्यात यायची. नाटूला वाटले आपण या बाटलीमध्ये शिरावे. तिच्यामध्ये बसून रंगीत प्रकाश दिसतो का हे बघावे. नाटू पाण्याच्या अगदी पृष्ठभागावर आला. दोन-तीन प्रयत्नातच इटुकला नाटू पटकन बाटलीत शिरला. बाटलीतल्या थोड्या पाण्यात इकडेतिकडे फिरू लागला. पाण्याची लाट आली की बाटली लाटेसोबत किनाऱ्याला येई. सोबत बाटलीतला नाटूही किनाऱ्याकडे यायचा. लाट ओसरली की बाटली वाळूवरून घरंगळत पाण्यात यायची. सोबत नाटू घरंगळत यायचा. नाटूला भारी मजा येत होती.या खेळाची नाटूला गंमत वाटली. आपण बाटलीत मस्त पडून रहायचे. बाटलीसोबत पुढे जायचे, मागे यायचे.

जणू झोपाळाच ! नाटू बाटलीतल्या पाण्यातच जोरजोराने हसू लागला. लाटांच्या गाजात त्याचे हसणे कोणालाच ऐकू गेले नाही.

शेवटची लाट जोराने आली, तशी बाटली एकदम किनाऱ्यापासून दूर वाळूवर फेकली गेली. एका शिंपल्याला अडकली. थोड्या वेळाने भरती ओसरली नि ओहोटी सुरू झाली. नाटू बाटलीत इकडेतिकडे पळू लागला. मात्र बाटली एकाच जागेवर होती. नाटूला गंमत वाटेना! थोड्या वेळाने त्याला भूकही लागली. बाटलीतल्या पाण्यात कोणताच खाऊ नव्हता. आणखी थोड्या वेळाने बाटलीत अंधार दाटू लागला. तेव्हा मात्र नाटूला आपल्या आई-बाबांची आठवण आली. तो जोरजोराने सुळक्या मारू लागला. मात्र बाटलीत थोडे पाणी होते, त्यामुळे नाटूने जोराने सुळकी मारली की त्याचे डोके बाटलीवर आदळायचे. नाक चोंदायचं! नाटूला अगदी रडायला आलं. मात्र बाटलीतल्या पाण्यात नाटूचे अश्रू मिसळून गेले.

तिकडे नाटूच्या आई-बाबांना त्याची फारच काळजी वाटू लागली. त्यांना नाटूचा रागही आला. नाटू न सांगताच किनाऱ्याकडे जातो ही गोष्ट त्यांना आवडत नव्हती. पण ही वेळ रागावण्याची नाही असा विचार करून त्यांनी रात्रभर नाटूचा शोध घेतला.

''आता भरती आल्यावरच काहीतरी थांगपत्ता लागेल. तू काळजी करू नकोस. मी शोधेन आपल्या नाटूला!'' नाटूचे बाबा त्याच्या आईला समजावत होते. दोघांचे डोळे अश्रूंनी भरले होते.

ओहोटी संपली नि भरती सुरू झाली. नाटूचे बाबा किनाऱ्याकडे निघाले होते. जसा जसा वेळ जाऊ लागला, तस-तशा उंच लाटा उसळू लागल्या. पाणी किनाऱ्यापर्यंत धडकू लागले. लाटांचा फेस वाळूवर पसरत होता. एक जोराची लाट आली. शिंपल्याला अडकलेल्या बाटलीला धडकली. बाटली पाण्यावर तरंगू लागली. ओसरणाऱ्या पाण्यासोबत बाटली समुद्रात आली. हेलकावणाऱ्या बाटलीमुळे नाटू सावध झाला. पाण्याच्या लाटेवर बाटली झोक्यासारखी हेलकावत होती, मात्र नाटूला आता झोक्याची गंमत वाटेना. तो बाटलीचे तोंड शोधत सुळक्या मारू लागला. तो थकला होता तरी त्याने एक जोराची मुसंडी घेत बाटलीतून बाहेर पडला. ते समुद्राच्या पाण्यातच पडला. भुकेमुळे, पाण्यातल्या प्राणवायूच्या कमतरतेमुळे त्याच्या शरीरात त्राणच राहिले नव्हते. थोड्या वेळाने त्याचे बाबा त्याच्याजवळ आले. त्यांनी त्याला थोडा खाऊ दिला.

''चल ! तुझी आई कधीची तुझी वाट पाहतेय!'' नाटूचे बाबा म्हणाले.

आईजवळ येताच नाटू म्हणाला, ''आई-बाबा माझं चुकलं. तुम्ही सांगता तसंच मी वागायला हवं होतं. मी उतावीळपणा करायला गेलो नि.....'' नाटू आपल्या आईच्या पोटाखाली गेला. दोघे बराचवेळ समांतर पोहत होते.

''बाळ! मोठ्या माणसांचे सांगणे ऐकावे. जीवन जगण्याचा त्यांचा अनुभव अधिक असतो, म्हणून त्यांचे ऐकावे.'' नाटूचे वडील त्याला समजावत होते.

''आई-बाबा! यापुढे मी असं वागणार नाही! तुम्हांला विचारल्याशिवाय उगीच किनाऱ्याला जाणार नाही.'' नाटू आपल्या आईच्या पोटाशी चिकटत शेपटी इकडेतिकडे फिरवत होता. त्यावरून त्याच्या आईने ओळखले की स्वारीला भूक लागलेय.

खाऊ खाता खाता नाटू त्याची झालेली फजिती आई-बाबांना सांगत होता. वरून समुद्राच्या लाटा उसळतच होत्या.

**संपर्क : ९६२३१६९४०३**

आश्लेषा महाजन

# पाऊस थकूनी गेला...





पाऊस थकूनी गेला, गडगडाट झाला मंद
अन् इंद्रधनुष्यावरती रेलून थांबला स्तब्ध..

सर्दीने झाला जाम, खोकून लागली धाप
श्वासांत विषाणू घुसला, अंगात फणफणे ताप..

अर्धीच राहिली कामे, कितीतरी बरसणे बाकी
पृथ्वीला सुजला करणे, जी उन्हात ओकीबोकी..

पाण्याचा झिरझिरणारा अंगरखा घालून छान
ते चक्क दवाखान्यात, अवतरले ओले ध्यान..!

द्या म्हणे औषधे काही, ओ डॉक्टर, द्या हो गोळी
मग पुन्हा बरसतील धारा, देऊन विजेला टाळी..





डॉक्टरही अवाक् झाले, ते 'आरपार' पाहून
मग नीट तपासून सारे, औषधे दिली मोजून..

डॉक्टरचे शुल्क म्हणूनी, ज्या आणल्या होत्या गारा
त्या हाती ठेवत उठला पाऊस सावरीत धारा..

डॉक्टरने केला टाटा, अन् दिली आपली छत्री
दे म्हणे दयाघना, हिरव्या समृद्ध सुगीची खात्री..

पाऊस हसला गाली, कडकडली वीज नभात
'सांभाळा पर्यावरणा..' हे शब्द उमटले त्यात...

संपर्क : ९८६०३८७१२३



# लबाड कोल्हा

शशिकांत काळे

एका रानात वाघ, लांडगा कोल्हा, मुंगूस आणि उंदीर अशा पाच प्राण्यांची गट्टी जमलेली होती. सगळे जण मजेत रहात होते. त्याच रानात एक धष्टपुष्ट काळवीटही फिरत असे. वाघाने त्याची शिकार करण्याचा खूप वेळा प्रयत्न केला. पण तो अतिशय चपळ असल्याने वाघाच्या तावडीत कधीच सापडला नाही. त्याची खंत वाघाला होती. त्याने तसे आपल्या मित्रांमधे बोलूनही दाखवले होते. वाघाने जर काळविटाची शिकार केली असती तर त्याचे रुचकर मांस लांडगा आणि कोल्ह्याला सुद्धा मिळाले असते. कोल्हा अत्यंत चतुर असल्याने त्याने एक उपाय सुचवला.

''वाघा, काळवीट अतिशय जोराने धावत असल्याने तू त्याला पकडू शकत नाहीस. त्यामुळे त्याची धाव मंदावेल असेच काही तरी केले पाहिजे. म्हणून मी असे सुचवतो की काळवीट रात्री झोपलेला असताना उंदराने त्याचे खूर कुरतडावेत. तसे झाले की दुखत्या पायामुळे काळवीट जोराने पळू शकणार नाही. मग तू त्याची शिकार करू शकशील.''



कोल्ह्याची ही योजना सगळ्यांना पटली. त्यानुसार उंदराने त्या काळविटाचे खूर कुरतडून टाकले त्याच्या दुखऱ्या पायामुळे काळविटाचा धावण्याचा वेग मंदावला आणि वाघाने त्याला पकडून ठार केले. इकडे कोल्ह्याचा मनात लोभ उत्पन्न झाला. त्याला वाटले की हे सगळे रुचकर मांस त्याला एकट्यालाच मिळावे. त्यासाठी त्याने युक्ती केली. काळविटाची शिकार करताना धावल्यामुळे वाघ धापा टाकत होता. त्यामुळे कोल्हा त्याच्या मित्रांना म्हणाला, ''खूप दिवसांनी आपल्याला रुचकर मांसाची मेजवानी मिळणार आहे. त्यामुळे मेजवानीला सुरुवात करण्यापूर्वी आपण सगळे स्नान करून घेऊया. पहिल्यांदा तुम्ही चौघे नदीवर जा. तुम्ही परत येईपर्यंत मी ह्या काळविटावर पहारा ठेवतो. तुम्ही आल्यानंतर मी स्नानाला जाईन. वाघालाही त्यामुळे थोडी विश्रांती मिळेल.'' सगळ्यांना कोल्ह्याचे म्हणणे पटले. त्यानुसार वाघ, लांडगा, मुंगूस आणि उंदीर नदीवर गेले. कोल्हा एकटाच मागे राहिला.

कोल्ह्याच्या अंदाजाप्रमाणे सगळ्यात प्रथम वाघच परत आला. तेव्हा कोल्हा आपला चेहरा पाडून बसला होता. वाघाने त्याला त्याचे कारण विचारले तेव्हा तो मोठ्या कष्टाने म्हणाला, ''वाघा तुला काय सांगू. इकडे उंदीर माझ्याकडे आला आणि म्हणाला, अरे मी त्या काळविटाचे पाय कुरतडले म्हणूनच वाघ त्याला मारू शकला म्हणजे माझ्यामुळेच ह्या वाघाला काळविटाचे मांस खायला मिळणार आहे.''

प्रत्यक्षात उंदीर असे काहीच म्हणाला नव्हता. पण ते ऐकून वाघाला राग आला आणि तो म्हणाला, ''तसे असेल तर मी ह्याचे मांस उष्टावणार ही नाही. मी माझ्या पराक्रमानेच दुसरी शिकार करीन आणि माझे पोट भरेन.'' असे म्हणून वाघ दुसरी शिकार शोधण्यासाठी जंगलात निघून गेला.

त्यानंतर उंदीर आला. त्याला पाहून लबाड कोल्हा म्हणाला, ''अरे आताच मुंगूस येऊन गेले. ते म्हणाले, हरीण हे वाघाचे अन्न आहे. ते मला पचणार नाही. माझे नैसर्गिक अन्न म्हणजे साप, उंदीर हेच आहे. त्यामुळे मी काळविटाच्या मांसाऐवजी साप, उंदीर शोधूनच माझी भूक भागवीन.''

कोल्ह्याचे हे बोलणे ऐकल्यावर उंदीर घाबरला आणि मुंगूस परत यायच्या अगोदरच दूर रानात जाऊन बिळात लपून बसला.

त्यानंतर लांडगा आला. त्याला पाहून कोल्हा म्हणाला, ''अरे लांडग्या, तुझी घडगत नाहीये. आताच वाघ येऊन वाघिणीला आणायला परत गेला आहे. वाघिणीला काळविटाच्या मांसामध्ये इतर कुणाचा वाटा असावा असे वाटत नाहीये. वाघाने सांगितले आहे म्हणूनच मी इथे काळविटाच्या रक्षणाला थांबलो आहे. आता तू काय करायचं ते तूच ठरव.''

कोल्ह्याचे बोलणे लांडग्याला खरे वाटले आणि तो म्हणाला, ''तसे असेल तर मी इथे न थांबणेच योग्य ठरेल. तू इथे थांब पण मी मात्र दूर निघून जाणार आहे.'' असे म्हणून लांडगाही दूर निघून गेला.

शेवटी मुंगूस आले. तेव्हा कोल्हा म्हणाला, ''हे बघ मुंगसा, वाघ आणि लांडगा हे तुझ्या अगोदरच येथे येऊन गेल्याचे तुला माहीत असेलच. ते माझ्यापेक्षा बलाने जरी श्रेष्ठ असले, तरी मी त्यांचा पराजय युक्ती वापरून केलेला आहे. तू तर साधा मुंगूसच आहेस. मी एकच फटक्यात तुला संपवू शकतो. तेव्हा आता तूच ठरव की माझ्या बरोबर युद्ध करायचे का जीव वाचवून पळून जायचे ?''

मुंगसाने वाघ, लांडगा यांच्या पावलांचे ठसे रानाच्या दिशेने जाताना पाहिले होतेच. त्यामुळे त्यानेही कोल्ह्याबरोबर लढाई न करण्याचा निर्णय घेतला आणि गुपचूप रानात निघून गेला.

आता त्या धष्टपुष्ट काळविटावर कोल्ह्याने खूप दिवस भूक भागवली.

**संपर्क : ९९७५२४४४६७**

# ढब्बा आणि थेंब कोठे बरं गेले?

**वैशाली सूर्यवंशी**

काळा काळा ढगोबा आकाशात ऐसपैस होता लोळलेला. कितीतरी मोठा... !

हत्ती एवढा..?
नाही. त्याहून मोठा..!
डोंगराएवढा?
नाहीच नाही. त्याहून पण मोठा..!

सुस्त पडलेला नुसता!
वाऱ्याने केली खोडी.
ह्याला जरा हलवू.
जरा थोडं पळवू,
नाहीतर गुदगुल्याच करू... !
मज्जा येईल..!

वारा गेला मग मोठ्या ढगोबाकडे आणि
लागला गुद्‌गुल्या करू
आधी हळू.
ढगोबा नुसताच जागचा हलला. कूस बदलून पलीकडे पाहू लागला.
वाऱ्याने धरला मग जोर.
ढगोबाला करू लागला जोरात गुदगुदू गुदगुदू





आता ढगोबा लागला हसू..
गडगड गडगड गडगडग
गडगड गडगड गडगडग
मग झाली गंमत..!

हसता हसता ढगोबात लपलेले पाऊस थेंब आले बाहेर.
सरसर सरसर सरसर सरसर
टपटप टपटप टपटप टपटप
ढगोबा हसतच होता आणि थेंब पडतच होते. पडतच होते.
काही थेंब पडले गुलाबाच्या बुडाशी जाऊन भेटले
गुलाबाच्या मुळांशी.



गुलाबाच्या फांद्यांना होत्या खूप खूप कळ्या.
कळ्यांनी घेतले थेंबांना जवळ बोलावून.
खोडामधून मग गेले थेंब गेले कळ्यांना भेटायला.
मग झाली रात्र. रात्रीच्या वाऱ्यात, गार गार चांदण्यात
कळ्यांनी आणि थेंबांनी मारल्या खूप खूप गप्पा.

गप्पा मारत खूप उशीर झाला. थेंब आणि कळ्या झोपी गेले. मग झाली पहाट.
मग काय झालं बरं माहीत आहे का तुम्हांला?
कळ्यांच्या जागी गुलाबाला आता होती खूप खूप फुले
गोड गोड मुलांनो, सानुल्या फुलांनो, सांगा सांगा झटकन सांगा
कळ्या आणि पाऊस थेंब मग गेलेत बरं कोठे ?

संपर्क : ९४०३४०९६७७

# ससा कासव

राजेश्वरी किशोर

एकदा काय झालं? आमच्या घरात एक कासव जन्माला आलं. छान गोरं गोरं.. कुरळ्या केसांचं.. अर्धगोल भुवया जशा काही आत्ताच कोरल्यात... सरळ नाक.. लांबसडक बोटं.. छोटीशी नाजूक जिवणी... म्हणजे सौंदर्याचे सगळेच निकष पुरेपूर ठासून भरलेले.. पण लवकरच कळले की या सौंदर्याला काळा तीळ पण आहे..

कासव सगळ्याच बाबतीत आळशी निघाले.. उठून बसायचे कष्ट घेईना.. ना उभे राहायचे... बोलायचे कष्ट घेईना.. अगदीच काय खायचे कष्ट पण त्याला नको असायचे, अगदीच जबरदस्ती केली तर लगेचच अन्न बाहेर काढायचे..फक्त हातात मिळेल त्यातून आवाज करायचा म्हणजे कधी आपटून तर कधी वाजवून... त्या कासवाने चालावे, बोलावे म्हणून खूप वाट बघितली..



खूप दवाखाने पालथे घातले.. पण उपाय काही सापडेना...

एक दिवस एक रेकी गुरू भेटले.. त्यांनी उपाय सुचवला... कधीही विचार न केलेला उपाय ... ते म्हणाले, एक मार्ग आहे या कासवाला चालते बोलते करण्याचा... याच्यासाठी एक ससा पण जन्माला घाला... आम्हांला काही सुचेना.. एका कासवाच्या नाजूक तब्येतीला सांभाळता सांभाळता लढत होतो.. आता ससा सांभाळणे जमेल का? खूप विचारांती या परिस्थितीलाही सामोरे जाऊ असे ठरले...

एक दिवस एक छोटासा, गोरा गोरा.. गुबू गुबू ससुल्या जन्माला आला... त्याचा पहिला स्पर्श, पहिली नजर... सगळ्या जन्माचे सार्थक झाल्याचा अनुभव होता.. ससुल्या खूपच गोड होता.. कधी हट्ट नाही की कधी रडे नाही... त्याची प्रगती जणू सशाच्या वेगानेच सुरू होती...

कासवपण सारखे त्याच्यावर लक्ष ठेवून असायचे.. ससुल्याचे अनुकरण करायचे हा त्याने जणू चंगच बांधला.. ससुल्या लवकरच उभे रहायचा प्रयत्न करू लागला.. आणि काय आश्चर्य कासवाने पण आपला प्रयत्न सुरू केला की.. धडपडत उभे रहायचा प्रयत्न.. तोंडातून शब्द उच्चारायचा प्रयत्न.. अगदीच काय खायचापण प्रयत्न...

कासव आपल्याकडे पाहते, आपल्यासारखे करायला बघते हे जणू त्या ससुल्याला कळलेच होते.. ससुल्यापण कासवाला आपल्यासारखे करायला भाग पाडायचा... एकदा दोनदा कासव धडपडले तर ससुल्याच घाबरला.. मग त्याने पडण्याच्या क्षणी आम्हांला हाक मारायला सुरुवात केली...

दिवस खूप छान चालले होते..

ससुल्याने कधी स्पर्धा नाही केली... कासवाची कुवत ओळखून त्याच्याबरोबर असताना आपली चाल धीमी करायचा.. पण प्रत्येक वेळी त्याला कासव बरोबर पाहिजे असायचे... कासवाला शिकवत शिकवत ससुल्या मोठा होऊ लागला.. कासवपण आपल्या गतीने मोठे होत होते...

आता ससुल्या शाळेत जाऊ लागला... शाळेतली गंमत कधी एकदा घरी येऊन कासवाला सांगतो अस्सेच त्याला व्हायचे.. शाळेत कोणाचा वाढदिवस असला आणि एखादे चॉकलेट मिळाले तरी ससुल्या त्यातले अर्धे कासवाला द्यायचा... मगच स्वतः खायचा..

आता कासव थोडे थोडे चालायला बोलायला लागले होते..

ससुल्याचा अभ्यास घेताना कासवपण ऐकत बसायचे.. कासवाला गणित, विज्ञान आवडायचे नाही... पण कथा, कविता, गाणी मात्र फार आवडायची.. ससुल्या कविता म्हणतांना गडबडला की पुढचा शब्द कासव उच्चारायचा... ही एकच गोष्ट ससुल्याला नेहमीच खटकायची... माझ्या अभ्यासाच्या कविता त्याने का म्हणायच्या? यामुळे ससुल्याची थोडीशी चिडचिड व्हायची... पण नंतर परत नवनवीन गोष्टी कासवाला शिकवायचा...

आता ससुल्या मोठा होऊ लागला... कासवाची चाल मात्र मंद ती मंदच राहिली... मग ससुल्या कधी कधी आपली चाल सोडून कासवाच्या चालीला पकडून कासवाशी मस्ती करतो... कासवाला हसवतो.. ते बघून भरून पावते मी...

अशी ही आमच्या घरची 'ससा कासवाची गोष्ट...'

**संपर्क** : ९४६०४३१८८०



भाग ७

# करुणा

मनोज बोरगावकर

# कथा सद्‌गुणांची

आपण रोज भरमसाट शब्द वापरत असतो. सतत बोलत असतो. बादलीतून बदाबदा पाणी ओतावेत तसे आपल्या तोंडातून शब्द ओतत असतो. पण त्या शब्दांप्रमाणे वागत मात्र अजिबात नाही. म्हणूनच आपल्या शब्दाला किंमतच राहत नाही अजिबात. म्हणून जुनी माणसं म्हणतात शब्द जपून वापरावेत. शब्दाला जागावं. आपण आपल्या बोललेल्या शब्दाची किंमत ठेवली तर.... आपल्या जगण्यालाही ऐपत येते.

करुणा, दया या शब्दांविषयी असेच म्हणता येईल. मला त्याची खूप करुणा आली... त्याची खूप दया आली. पण आपली करुणा, दया या गोष्टी फक्त ओठातून येत असतात पोटातून मात्र अजिबात नाही. करुणा पोटातून, आतून मनातून येणं काय असतं हे आपण एका फकिराच्या कथेवरून समजून घेऊ या. ही कथा वाचल्यावर तुमच्या मनात अपार करुणा दाटून येईल पण तो शब्द वापरताना तुम्ही दहा वेळा विचार कराल.

ती गोष्ट अशी – एक फकीर आणि त्याची बायको जंगलात एका झोपडीत राहतं असतं. खूप आनंदाने समाधानाने.

एक दिवस काय होतं. जंगलात खूप मोठा पाऊस येतो. त्या इवल्याशा झोपडीत फकीर आणि त्याची बायको दाटीवाटीने कसेबसे झोपत. झोपडी खूप लहान होती पण फकिराचे मन खूप मोठं होते. त्या रात्री पण खूप मोठा पाऊस कोसळत होता. मध्यरात्री कोणी तरी झोपडीचं दार वाजवलं. फकीर विचारतो, ''कोण आहे बाहेर?'' थंडीनं कुडकुडत एक माणूस बाहेरून उत्तर देतो, ''अहो मी जंगलात रस्ता चुकलेला वाटसरू आहे, थंडीनं कुडकुडतोय.... पाऊस बेभान कोसळतोय! मला जरा रात्री पुरता झोपडीत घेऊन आसरा द्याल का जी?''

फकिराची बायको म्हणते, 'अहो, या झोपडीत आपल्या दोघांनाच कशीबशी झोपायला जागा पुरतेय, तिसरा कोणी आता या झोपडीत मावणार नाही... त्यामुळे तुम्ही त्याला आत घेण्याच्या फंदात पडू नका.' फकीर हसला आणि म्हणाला, 'खरंय बाई तुझं, आपल्या झोपडीत तिघांना झोपायला जागा अजिबात नाही पण आपण तिघे बसण्याइतपत जागा नक्कीच आहे. त्यामुळे त्याला बाहेर पावसात कुडकुडण्यापेक्षा आपण झोपडीत आत घेऊ या.' असे बोलताना त्या फकिराचा स्वर बाहेरच्या पावसापेक्षा जास्त भिजलेला होता. मग फकिराच्या पत्नीचाही नाईलाज झाला. मग ते तिघं भिंतीला पाठ टेकवून पाय लांब करून कशीबशी त्या झोपडीत बसून राहिली. तो वाटसरू त्या दोघांना सारखे आशीर्वाद देत होता. म्हणत होता, 'संकटात सापडणाऱ्यांना मदत करणे हीच खरी करुणा.'

एवढ्यात झोपडीच्या दारावर आणखी एक थाप पडली बाहेर पावसात कुडकुडणारा आणखी एक कोणीतरी त्याला झोपडीत घेण्यासाठी विनवणी करीत होता. नुकतेच करुणेविषयी गुणगान करणारा तो पहिला वाटसरू आणि फकिराची बायको. दोघे मिळून त्या चौथ्या माणसाला आत घेण्यासाठी फकिराला कडाडून विरोध करू लागले. फकीर त्यांचे अजिबात न ऐकता त्यांना शांतपणे समजावून सांगतो म्हणतो की, 'मला

मान्य आहे आपण चौघे या झोपडीत झोपू शकत नाही.. पण आपण चौघे भिंतीला टेकून मात्र रात्रभर आरामात बसू शकतो.. त्यामुळे आपण त्याला आत घेतलेच पाहिजे.' त्या दोघांचाही नाईलाज होतो. त्या माणसालाही झोपडीत घेतले जाते. आता झोपडीत चार माणसं आणि दोनच प्रवृत्ती असतात. एक करुणेचा सागर फकीर आणि दुसरे तिघं म्हणजे स्वतःपुरते पाहणारे आणि स्वार्थाने बरबटलेले.

थोड्या वेळाने झोपडीचे दार आणखी वाजते.... आता मात्र आतल्या फकिराशिवाय तिघांनी पण बाह्या सरसावलेल्या असतात, आणि ते तिघेही मोठ्या आवेशाने फकिराशी भांडायला लागतात. 'खबरदार आता तुम्ही दार उघडलेत आणि कोणाला आता घेतलेत तर. इथे अजिबात जागा शिल्लक नाही.' पण येऊन जाऊन फकिरच तो. तो या स्वार्थी लोकांना थोडाच जुमानणार आहे. तो झोपडीचे दार किलकिले करून पाहतो तर एक गाढव थंडीपावसात कुडकुडत झोपडीच्या दाराशी उभे आहे! फकीराची बायको बेंबीच्या देठापासून ओरडते 'खबरदार आता या गाढवाला आत घ्याल तर..'

पण करुणेने ओथंबलेल्या फकिराचे उत्तर तयार असते, तो म्हणतो, 'मला कळतंय आपण चौघे आणि गाढव या झोपडीत बसू पण शकणार नाही. पण आपण चौघे जर भिंतीला टेकून उभे राहिलो.. तर आपल्या बरोबर मधोमध गाढव आरामात उभे राहू शकेल की.. बिचारे पावसा पाण्यात थंडीत कुडकुडत मरून जाईल की आपण त्याला असे बाहेर उभे केले तर. त्यालाही वादळी पावसात आसरा मिळेल.. आणि हो तुम्ही अजिबात काळजी करू नका तुम्हांला फारच अडचण झाली तर मी आपला सरळ झोपडीच्या बाहेर जाऊन उभा राहीन मग तर झालं!' असे म्हणून फकिराने त्या गाढवालाही झोपडीत घेतले. ते तिघे चडफडत राहिले आणि फकीर गाढवाला आसरा मिळाला या आनंदात हसत राहिला. याला म्हणतात मित्रांनो खरीखुरी करुणा. म्हणून शब्द वापरताना त्याची किंमत ओळखा आणि आपण वापरलेल्या शब्दांची किंमत जपा. करुणेचा महासागर होता तो फकीर!

**संपर्क : ९८६०५६४१५४**

## चिंटू

चारुहास पंडित/प्रभाकर वाडेकर



# दत्त टेकडी

**मंदा खांडगे**

बालकवींच्या दत्तटेकडीवरी
उमलली इवलीशी गवतफुले
शुभ्र पांढरी नाजूकशी
सान सानुली गवतफुले
पाहुनी इवलीशी गवतफुले
गाली हसली 'फुलराणी'
'श्रावणमासी हर्ष मानसी
हिरवळ दाटे चोहीकडे'


इथेच रचले त्यांनी
हे सृष्टीचे सुंदर गाणे
टेकडीच्या पायथ्याशी
नागमोडी वळणे घेऊनी
शिटी फुंकत जाते इंजिनगाडी
घुमतो आवाज तिचा कडेकपारी
पाहा एकदा ही दत्तटेकडी
निसर्गवेडी दत्तटेकडी

संपर्क : ९३२६८४२२०५



# हराळी

माणिक पुरी



आज हरोळीचा मला जरा जास्तच राग आला. तसं कारणही फार मोठं नव्हतं. माझ्या डाव्या हातावर बसलेल्या हरोळीला उजव्या हाताने पपई खाऊ घालत होतो. पण छे तिनं पपईला तोंड लावलं नाही. पपईकडं पाहिलं सुद्‌धा नाही. दररोज तिला अंगणात आणायचो. भरवायचो. आजसुद्‌धा अंजिराच्या झाडाजवळ उभा राहून तिचे खाण्याचे लाड पुरवीत होतो. तिनं एकदाच पंख सटर-फटर केले अन् अंजिराच्या झाडाकडं झेपावली. गळफांदीवर बसून माझ्याकडं पाहत होती. मी मात्र हातात पपई घेऊन कितीतरी वेळ तसाच ताटकळत उभा होतो. मी तिच्यासारखाच हट्टाला पेटलेलो. तिला पपई खावू घातल्याशिवाय माझ्या मनाला चैन पडणार नव्हती.

तसं पाहता काल सायंकाळी चार वाजता तिनं आवडीनं पपई खाल्ली होती. त्यापूर्वीसुद्‌धा दीड महिन्यांपासून रोज सकाळ-सायंकाळ पपई भरवत असे. पिकलेल्या अंजिरावर तर तुटून पडायची. कधी पिंपळाची पिकलेली रसाळ पिपरं चाखायची. वडाची फळं तिला आवडत नसत. पेरूकडे तर ढुंकूनही पाहत नसे.

ती घरी आली तेव्हा जखमी अवस्थेत होती. माझ्या झोपण्याच्या खोलीतच तिचा पिंजरा आणून ठेवलेला. एक आठवडाभरच ती पिंजऱ्यात राहिली. त्यानंतर सगळं घर तिच्यासाठी मोकळंच होतं. ती दीड महिनाच का होईना पण घरभर वावरली. तिच्या पंखाची जखम जसजशी बरी होऊ लागली तसतशी पंखांची उघडझापही चांगली सुरू राहायची. तिला उडायला येऊ लागल्यावर तिचे पाय थांबायचं नावच घेत नव्हते.

काही दिवसांनी ती खुर्चीकडं झेपावली. त्यानंतर टेबलावर. त्यापुढे शिलाई मशीनवर. पुस्तकाच्या कपाटावर. जिथं नाही तिथं घरभर फिरू लागली. तिला उडता येऊ लागलं याचाच आनंद झाला होता. त्या दिवसापासून घरातील दोन्ही पंखे बंद केले होते. माझ्या डाव्या हातावर बसण्याची तिला सवय झालेली. तिला हातावर घेऊन घरभर फिरायचो. पपई खाऊ घालायचो. सगळ्या घराची तिला ओळख झालेली.

एका महिन्यानंतर तिला अंगणात घेऊन आलो. माझ्या हातावरून लहानशा बदामाच्या झाडाकडं झेपावली. तिच्या ओझ्यानं फांदी चांगलीच वाकली. तिला पकडण्यासाठी गेलो तेव्हा ती पारिजातकाच्या फांदीवर विसावली. त्यानंतर अंजिराच्या झाडावर स्थिरावली. ती तिथंच कितीतरी वेळ रमलेली. त्या वेळी अंगणातील सगळ्या झाडांवर तिची नजर भिरभिरत होती. जणू डोळ्यांनी झाडांचा पाठलाग करत होती.

या घटनेनंतर तिला घरात करमत नसे. सारखं बाहेर घेऊन यावं लागे. अंजिराच्या फांदीवर बसायची. खालच्या फांदीवर, वरच्या फांदीवर असं करत-करत ती शेंड्याकडं सरकत असे. मी मात्र हातात पपई घेऊन ती खाली येण्याची वाट पाहत असे. ती दूरवरचा परिसर न्याहाळीत होती.

तिला काही ओळखीच्या खाणा-खुणा सापडल्या असाव्यात का? तिचं माझ्याकडं कमी आणि बाहेरच जास्त लक्ष होतं हे हळूहळू कळू लागलं. मला वाटलं ती खाली यायची नाही. पण भूक ही अशी गोष्ट आहे की, कधीकधी पराजित करते. ऊन चांगलंच वाढू लागलं. तशी हरोळी गळफांदीवर येऊन बसली. माझ्या हातातील पपई खाऊ लागली. हातावर बसली. आम्ही घरात आलो. पण तिचं चित्त थाऱ्यावर मुळीच नव्हतं!

माझ्या घरी राहत असलेली हरोळी नर आहे की मादी हे कळालं नाही. 'हरोळी'हा शब्द स्त्रीलिंगी

असल्यामुळे मी तिला 'ती' या नावानेच हाक मारायचो. 'हरोळी तू काय करतेस?'असे प्रश्नही अधूनमधून विचारायचो. ती कुठे माझ्याशी बोलते ? पण मी मात्र सारखं तिच्याशी बोलायचो. तिला खायला काय आवडतं हे चांगलंच कळू लागलं तेव्हा तिच्या आवडीचीच फळं घरात आणू लागलो. त्याच्यामुळे मलाही फळं खायची सवय लागली. फळांचा रस पिऊ लागलो. माझ्याही अंगात चांगलीच तरतरी जाणवू लागली.

दुसऱ्या दिवशी पहाटे पिंपळाच्या झाडावर हरोळ्यांचा एक थवा उतरला. त्यांनी किती गलका केला. माझ्या जवळच बसलेल्या हरोळीनं पंखांची कितीतरी वेळा उघडझाप करत खिडकीकडे धाव घेतली. ती खिडकीतून हरोळ्यांकडं एकटक पाहत होती. मी तिच्याकडं पाहत होतो. खिडकीला जाळी असल्यामुळे तिला बाहेर जाता आलं नाही. मी जर खिडकी उघडली असती तर क्षणाचा विलंब न करता ती थव्यात एकरूप झाली असती. तिनं खिडकीजवळ किती फडफड केली. तिच्या जाण्यामुळं मला त्रास होणार होता का ? मी का बरं खिडकी उघडली नाही ? पक्ष्यांना मुक्त वातावरणात राहायला आवडतं हे माहीत असूनही खिडकी उघडायला माझे हात का थरथरत होते ? तिला माझा लळा लागला होता का ? तसं असतं तर तिनं खिडकीतून बाहेर जाण्यासाठी धडपडच केली नसती. ती पाखरांची खरी दुनिया होती. त्या पाखरांची भाषा मला कुठं कळत होती? असे अनेक प्रश्न मनावर आदळत होते.

काल सकाळी अंजिराच्या झाडावर बसून तिनं टेहळणी केलेली. आज सकाळीच या पाखरांचा थवा तिला घेऊन जाण्यासाठी तर आला नसेल. त्यांनी केलेला गलका तिच्यासाठी संकेतच असला पाहिजे. हरोळी माझ्या हातावर बसली. आम्ही दोघे अंगणात आलो. तोपर्यंत पिंपळावर विराजमान झालेला थवा निघून गेला होता.

आज सवयीप्रमाणं ती अंजिराच्या गळफांदीवर बसली होती. माझ्याकडं पाहत होती. मी मात्र हातात पपई घेऊन कितीतरी वेळ तसाच ताटकळत उभा होतो

मी नुसता हट्टाला पेटून काय उपयोग ? तिचा रागराग करून मी स्वतःलाच डिवचत होतो. तिला खाऊ घातल्याशिवाय माझ्या मनाला चैन पडणार नव्हती हे अगदी खरंय. पण तिनं माझ्या हातची पपई का खावी ? पक्ष्यांनाही माणसाचा राग येतो याची अनुभूती घेत होतो. आज पहाटे तिला खिडकीतून बाहेर पडू दिलं असतं तर माझ्या जगण्यात काय फरक पडला असता ? तिच्या मनासारखं तिला बाहेर पडता आलं नाही आणि माझ्या मनासारखं तिला भरवता येत नाही. दोघांची दुहेरी कोंडी झाली होती.

आज हरोळीचा चेहरा पडला होता हे प्रथमच जाणवलं. तिला तिच्या थव्यात परत जायचंय हे तिच्या वागण्यातून कळू लागलं. तिनं दुपारपर्यंत पपईला तोंड लावलं नाही. त्या दिवशी माझीसुद्धा जेवणावरची इच्छा उडून गेलेली. पपई तिच्या पुढ्यात ठेवून बाहेर पिंपळाखाली येऊन बसलो.

या पिंपळावर काही वेळापूर्वी हरोळ्यांचा थवा उतरला होता. त्यानंतर कितीतरी तांबट पक्षी अवतरले. निघून गेले. लगोलग बुलबुल, कोकीळ यांनी सुद्धा फळं चाखली. जमिनीवर फळांचा सडा पडलेला. काही पिकलेली फळं हरोळीसाठी उचलली. घरात गेलो. तिनं अजूनही पपईला तोंड लावलं नव्हतं.

एखादा पक्षी माझ्यावर एवढा रागावू शकतो हे मी प्रथमच अनुभवत होतो. हात पुढे करताच ती हातावर

बसली. पपई घेतली. पिंपळाच्या झाडाखाली आलो. पपईचा घास भरू लागलो. आता मात्र तिनं आवडीनं पपई खाल्ली. मी हात उंच केला तशी हरोळी पिंपळाच्या फांदीवर जाऊन बसली. आज दिवसभर आणि रात्रभर ती पिंपळाच्या झाडावरच थांबली होती. मी रात्री दोन वेळा तिला पाहून गेलो. तिच्या अंगावर बॅटरीचा झोत टाकला तेव्हा तिलाही माझ्या मनाची तगमग कळली असेल. त्या रात्री मला गाढ अशी झोप लागलीच नव्हती.

पहाटे हरोळीच्या आवाजानेच जागा झालो. आतल्या खोलीत जाऊन खिडकी उघडली. किती तरी हरोळ्या पिंपळावर उतरल्या होत्या. मी पळतच अंगणात आलो. आज हरोळ्यांनी जाण्याची घाई अजिबात केली नाही. सगळीकडं फटफटलं. तरी हरोळ्या पिंपळावरच थांबलेल्या. दीड महिना माझ्या घरात वावरलेली हरोळी त्या थव्यात एकरूप झाली होती. सूर्याची किरणे पिंपळावर उतरली आणि हरोळ्या उडून गेल्या..

**संपर्क : ९८८१९६७३४६**



अमित डहाणे

‘किशोर’ मित्रांनो,
‘किशोर’ जून २०२३ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे ‘किशोर’कडे २५ जुलै २०२३ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत किंवा ई-मेल करावा.

# कुतूहल

संपर्क : ९४२१०५०३८८

**१) जगाच्या एकूण लोकसंख्येच्या १/३ लोकसंख्या कोणत्या देशात आहे?**

१) भारत २) चीन
३) अमेरिका ४) भारत व चीन

**२) शौर्य पुरस्कार मिळवणाऱ्या भारतीय हवाई दलाच्या पहिल्या महिला अधिकारी कोण?**

१) विंग कमांडर दीपिका मिश्रा
२) एअर मार्शल हरविंदर चौधरी
३) कॅप्टन नयना रानडे
४) कॅप्टन आयुक्ता चौधरी

**३) साने गुरुजी यांची कर्मभूमी म्हणून कोणत्या ठिकाणाचा उल्लेख करण्यात येतो?**

१) पालगड २) पुणे
३) नाशिक ४) अमळनेर

**४) भारताच्या इतिहासातील कोणत्या महत्त्वाच्या न्यायालयीन खटल्याला यावर्षी ५० वर्षे पूर्ण झाली आहेत?**

१) मिनर्व्हा मिल्स प्रकरण
२) केशवानंद भारती प्रकरण
३) गोरखनाथ प्रकरण
४) सज्जनसिंग प्रकरण

**५) गणिताचा ‘नोबेल’ म्हणून कोणता पुरस्कार ओळखला जातो?**

१) पुलित्झर २) सरस्वती सम्मान
३) एबेल ४) लिजेंड ऑफ मॅथ

**६) २०२३ वर्षाचा आंतरराष्ट्रीय सांख्यिकी पुरस्कार कोणाला मिळाला?**

१) सोनम वांगचुक २) एंजेला मर्केल
३) राज सुब्रमण्यम ४) सी.आर.राव

**७) एम. वीरालक्ष्मी हे नाव कोणत्या कारणासाठी चर्चेत होते?**

१) भारताची पहिली महिला रुग्णवाहिका ड्रायव्हर
२) ‘सेबी’च्या पहिल्या महिला अध्यक्ष
३) भारतातील सर्वात युवा संसदपटू
४) नाबार्डच्या पहिल्या महिला अध्यक्षा

**८) ‘ऑपरेशन कावेरी’ कोणत्या देशातील भारतीयांच्या सुटकेसाठी राबवण्यात येणारी मोहीम आहे?**

१) युक्रेन २) रशिया
३) सुदान ४) अफगाणिस्तान

**९) जागतिक पातळीच्या ‘ग्रेट बँक यार्ड’ पक्षी गणनेत भारत देश कितव्या स्थानी आहे?**

१) पहिल्या २) दुसऱ्या
३) तिसऱ्या ४) चौथ्या

**१०) भारतीय सर्कसचे पितामह म्हणून कोणाला ओळखले जाते?**

१) जेमिनी शंकरन
२) सुजित सरकार
३) आप्पासाहेब केळकर
४) आर. शंकराचार्य

**११) नुकतेच निधन झालेले प्रकाश सिंह बादल हे कोणत्या राज्याचे मुख्यमंत्री होते?**

१)हरियाना २) हिमाचल

३) पंजाब ४) उत्तराखंड

**१२) 'मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्र' कोणत्या जिल्ह्यात आहे ?**

१) चंद्रपूर २) नागपूर

३) वर्धा ४) अमरावती

**१३) कोणत्या पदार्थाला पेशी गंजवणारे पदार्थ म्हणून ओळखतात?**

१) साखर २) तिखट

३) मीठ ४) मांस

**१४) योगासनाच्या कोणत्या आसनाला उंची वाढणारे आसन असे म्हणतात?**

१) ताडासन २) वृक्षासन

३) सेतूबंधासन ४) भुजंगासन


**१५) खालीलपैकी कोणत्या वृक्षापासून क्रीडा साहित्य तयार करतात?**

१) साग २) बाभूळ

३) काखिरी बिलो ४) महोगनी

---

## जून २०२३ च्या चित्रकोड्याचे उत्तर




## कुतूहल जून २०२३ ची उत्तरे

| | | |
|---|---|---|
| १) २ | २) ३ | ३) १ |
| ४) ३ | ५) ४ | ६) ३ |
| ७) २ | ८) २ | ९) २ |
| १०) २ | ११) १ | १२) २ |
| १३) ३ | १४) ४ | १५) ४ |

## कुतूहल मे २०२३ – यशस्वी स्पर्धक

कु.युक्ता देशमुख

## चित्रकोडे मे २०२३ – यशस्वी स्पर्धक

**पुणे** – कु.आर्या गांधी, कु. प्रांजल सावंत

**सातारा** – कु.सुवीर फडे, कु.आर्यन जगदाळे, कु.शौर्य सरगडे, कु.पार्थ पाटील, कु.ओम पोळ

**अमरावती** – कु.सपना बाकोडे, कु.काजल बाकोडे, कु.भुमिका बाकोडे, कु.संजना बाकोडे, कु.चिराग धंदरे, कु. गुरू धंदरे, कु. खुशी धंदरे, कु.पूजा इंगळे, कु.दीक्षा, इंगळे, कु.चैत्र नळकांडे, कु.श्रेस्ती नळकांडे, कु.अनिकेत इंगळे, कु.अश्विनी वानखडे, कु.सुवर्णा वानखडे, कु.किरण वानखडे, कु.आराध्या वानखडे, कु.सुहास वानखडे, कु. सोनू पाटील वानखडे

**नाशिक** – कु.आदित्य नंदन, कु.श्रुतिक पगार, कु.प्रज्ज्वल भदाणे, कु.सुशांत जाधव, कु.कृष्णा कापसे, कु.लकी बागुल, कु.अवधूत निफाडे , कु.प्रणव पुणेकर

**ठाणे** – कु. श्रुती परांजपे

**मुंबई** – कु. देवेंद्र बिडकर, कु. देवयानी बिडकर,

**अकोला** – कु. अंकुश शेटे, कु.युक्ता देशमुख

**परभणी** – कु. प्रज्ज्वल ठाकर

**वर्धा** – कु. टिना मेंढुले

**रत्नागिरी** – कु. सुमुख केतकर

**नागपूर** – कु. प्राजक्ता गोखले, कु.सृष्टी सावंत, कु.राम सावंत

**सिंधुदुर्ग** – कु.ध्रुव कांदळगावकर

**सोलापूर** – कु.प्रतिक जाधव

# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

* तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
* जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
* ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हालाही वाटते ना?

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ', तुम्हाला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु.५/–चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



रविवारची सुट्टी असल्यामुळे मी घरात अभ्यास करत होते. अचानक कुत्र्याचे पिल्लू ओरडत असल्याचा आवाज आला. बाहेर जाऊन पाहिले तर ते मोठ्या पावसात भिजत ओरडत आमच्या अंगणात येत होते. मला त्याची खूप दया आली. मी आणि अभिज्ञा दिदी लगेच छत्री घेऊन त्या पिल्लाला पोर्चमध्ये आणले. ते भिजल्यामुळे थंडीने कुडकुडत होते. मी घरातील स्वच्छ कापड आणून त्याचे अंग पुसले. त्याला गोंजारले व थोडे कुशीत घेतले. मग ते माझ्याशी खेळायला लागले. माझ्या आई–बाबांनी त्याच्यासाठी दुधात चपाती कुस्करून दिली. त्याचे पोट भरल्यामुळे ते झोपी गेले. थोड्या वेळाने ते जागे झाले. आम्ही त्याला त्याच्या आईकडे व त्याच्या भावंडाकडे सोडले. मला त्याचा लळा लागल्यामुळे खूप आठवण येत होती. रात्री मी जेवताना परत पिल्लू दारात येऊन ओरडत होते. मी जेवण सोडून त्याला जाडसर कपड्यात बसवून दूध भाकरी दिली. ते खाल्यानंतर आम्ही त्याला सोडून आलो. मला त्याची खूप आठवण येत होती. सकाळी शाळेची तयारी करत असताना ते पिल्लू परत आले. मी त्याला जवळ घेऊन गोंजारले आणि मी शाळेत जाताना बसजवळ मला ते पोहोचवण्यास आले. मला समाजाला सांगावेसे वाटते की मुक्या प्राण्यांवर दया व प्रेम करावे.

**कु तेजस्विनी शिवाजी कोतोलीकर,**
इयत्ता ४ थी, दत्तसेवा विद्यालय, मु. तुरूकवाडी,
ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर ४१६२१४



एके दिवशी शेजारचे काका झाड लावत होते. मी त्याच्या जवळ गेलो. मी विचारले की 'झाड का लावत आहात?' काका म्हणाले, 'झाड आपल्याला ऑक्सिजन, फळे, फुले देतात.' शाळेत जाण्याची वेळ झाली होती. माझी आई बाहेर येऊन म्हणाली, 'शाळेची वेळ झाली लवकर शाळेत जाय. मी व माझे मित्र सोहम, आनन व साहिल शाळेत गेलो. मी माझ्या सरांना विचारले की, झाड काहून लावायचे? माझ्या घरासमोरचे काका झाडे लावत होते. त्यांनी मला सांगितले झाडे आपल्याला ऑक्सिजन, फळे व फुले देतात. माझे सर म्हणाले की, आपल्याला झाडापासून औषधे व खूप वायू मिळतात. मी म्हणालो, 'सर मी माझ्या मित्रांना सांगेन घरी झाडे लावायला. मग मी माझ्या वर्गात गेलो व माझ्या मित्रांना सांगितले तुमच्या घरी झाडे लावा. शाळेला सुट्टी लागली. मी घरी आल्यानंतर माझ्या बाबांना सांगितले की बाबा मला झाडे लावायची आहे. बाबाने माती व झाडांची कलमे दिली. माझ्या मित्रांनी व मी झाडे लावली.

**कु. करण देवानंद पाटोळे**
इयत्ता ७ वी, मु. पो.खंडाळा
ता. तेल्हारा, जिल्हा अकोला ४४४१०३



माझे नाव श्रावणी, मी इयत्ता चौथीमध्ये आहे. आमच्या शाळेपासून माझे घर लांब आहे. शेळीचे एक करडू रस्त्यावर आडवे पळत होते. मी पुढे गेले आणि त्याला पकडले व त्याच्या मालकाला दिले. मालकाने मला शाबासकी दिली व मालक म्हणाले, तुझ्यामुळे आमचे शेळीचे करडू वाचले नाहीतर ते आज मेले असते. त्यांनी माझे कौतुक केले व मला १० रुपये खाऊसाठी दिले. मला खूप आनंद झाला. मी त्यांचे आभार मानले. ही गोष्ट मी माझ्या सरांना सांगितली. त्यांना खूप आनंद वाटला ते म्हणाले, ''छान असेच चांगले काम करत जा.'' ही माहिती सरांनी परिपाठात सांगितली व शाबासकी दिली.

**कु. श्रावणी संदीप विधाते**

जि. प. प्राथ. शाळा कडुवस्ती (सात्रक) सोनगाव,
ता. राहुरी, जि. अहमदनगर ४१३७११



मी एकदा रविवारची सुट्टी असल्यामुळे वडलांबरोबर बाजारात गेले होते. तेव्हा एका हॉटेलसमोर एक लहान बाळ त्याच्या आईकडे भूक लागली म्हणून रडत होते. पण त्याच्या आईकडे कदाचित पैसे नसतील म्हणून ती त्याला समजावत होती आणि तिचा चेहरापण केविलवाणा वाटत होता. म्हणून मी वडलांना सांगून त्या आईकडे काही पैसे दिले तेव्हा ती नको म्हणाली. परंतु मी आग्रह करून ते पैसे त्यांना दिले. तेव्हा त्या मुलाला व त्या आईला खूप आनंद झाला. त्यांनी मला 'माझी बाय गे' असं म्हणून आशीर्वाद दिला. मला खूप समाधान वाटले व आनंद झाला.

**कु. स्वरांजली प्रवीण घुले**

इयत्ता ३ री, जि. प. प्राथ. केंद्र शाळा,
राजापूर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर



रविवारचा दिवस होता. मी आणि पप्पा बाहेर जाण्यासाठी गाडीवरून निघालो. जाताना रस्त्यात एक दृश्य दिसले. डोंबाऱ्याचा खेळ चालू होता. माझ्याच वयाची एक मुलगी दोरीवरून चालण्याची कसरत करत होती. तिची आई जोरात हलगी वाजवत होती. खूप गर्दी जमा झाली होती. शेजारी जवळच तिचे बाबा बाळाला घेऊन बसले होते. हे सर्व बघून मला खूप वाईट वाटले. त्यांना मदत करावी असे मला वाटले. मी पप्पांकडून १० रूपये घेऊन त्या मुलीच्या हातात दिले. छोट्या बाळालाही दोन केळी देऊन आलो. माझ्याप्रमाणे त्या मुलीला शिकता येत नसल्याने मला खूप वाईट वाटले. घरी आल्यावर घडलेला सारा प्रसंग आईला सांगितला. आईलाही खूप वाईट वाटले. पण मी मदत केल्याचे ऐकून तिला खूप आनंद झाला. शाळेतील सरांनीही मला शाबासकी देऊन कौतुक केले. मित्रांनीही माझे अभिनंदन केले.

**कु. प्रज्ज्वल किरण गावडे,** इयत्ता ५ वी,
कुर्डूवाडी रोड, तरटे किराणा दुकानाच्या पाठीमागे, मु.पो. टेंभुर्णी, ता.माढा, जि.सोलापूर ४१३४११

# उमलती प्रतिभा

## आखाजीचा झोका

आली आली आखाजी
जास्त आंबे खाऊ नका जी!
गुढीपाडव्याचा सण हा गेला
आखाजीचा मुहूर्त उजाडला
याला म्हणतात अक्षय तृतीया
झाडाला झोका बांधूया
झाडाला झोका बांधला
उंचच उंच घेतला
झोका घ्यायची मजाच न्यारी
हक्क गाजवते यावर नारी
झोका घेऊन पाहूया
गोड–गोड आमरस खाऊया
मऊ–मऊ पुरणपोळ्या करते आजी
या दिवशी मात्र नको असते भाजी
आमरस–पुरणपोळीचे जेवण छान
आखाजीला आहे मुहूर्ताचा मान

पूर्वा प्रवीण शिंदे
इयत्ता ८ वी
लिटिल एन्जलस् इंग्लिश मिडियम स्कूल, मालेगाव
ता. मालेगाव, जि. नाशिक

## पाऊस

पावसा पावसा ये रे ये
पावसा पावसा ये रे ये...
पाऊस आला रिमझिम
सारे झाले ओले चिंब
पाऊस पडला धो धो धो
आम्ही खेळतो खो खो खो...
पाऊस पडला जोरात जोरात
गंपू पडला दारात दारात
उन्हात पाऊस पावसात ऊन
इंद्रधनुष्याची वेगळीच खूण...
पाऊस पडला खूप खूप
आम्ही झालो खूष खूप
पाऊस आला पाऊस आला
आम्हांला हो आनंद झाला...
पाऊस पडला मस्त
आम्ही जेवण केले फस्त
पाऊस झाला मुसळधार
झाडे झाली हिरवीगार...

कु. श्रेया धनंजय पुजारी,
इयत्ता ४ थी,
जि.प.प्रा. केंद्रशाळा, अंकोली, ता.मोहोळ, जि.सोलापूर



कु. दिव्यांशी मानकर, इ.८ वी,
०३,'त्रिमूर्तीधाम' लक्ष्मीनारायण शर्मा चाळ, मुंबई–पुणे रोड,
ठाकुरपाडा, मुंब्रा, ता. जि. ठाणे ४००६६२





कु. स्वरा वाघोलीकर, ५ वर्षे, सीनियर केजी
ध्रुव ग्लोबल स्कूल, मालपाणी कॅम्पस, अकोले रोड,
धांदरफळ, संगमनेर, महाराष्ट्र ४२२६०५

# आंब्याची दुनिया

आंब्यांच्या नगरीमध्ये आंबे आहेत खूप
चाहे असो पाऊस चाहे असो धूप

आंब्यांच्या नगरीमध्ये आंबे भरपूर
नद्यांनाही येतो आमरसाचा पूर

आंब्याच्याच गाड्या तिथे आंब्याचीच घरे
जिकडेतिकडे दिसतात आमरसाचे झरे

पक्षी खातात आंबे तिथे माणसेही आंबे खातात
पाणी म्हणून तिथे आमरसच पितात

माणसे आंब्यासारखी दिसतात, पक्षीही दिसतात
जिकडे बघू तिकडे चरपसे चरपसे ओरडतात

इकडे नाही वाचनालय, इकडे नाही शाळा
तुम्हांला जिथे वाटतंय तिकडे हमखास पळा

आंब्याच्या दुनियेमध्ये आंबे इतके असतात
आंबे काढता काढता माणसे थकून जातात

आंब्याचाच पलंग तिथे आंब्याचाच सोफा
या, बसा, खेळा आणि इथेच झोपा

आंब्याचीही दुनिया आहे खूप अनोखी
म्हणूनच तर इकडची माणसे कधीच नसतात दु:खी

**अन्वित शीतलकुमार भोंग**
इयत्ता ३ री, अक्षरनंदन शाळा,
सेनापती बापट रोड, पुणे



# बैल

बैलाचे असतात वेगवेगळे रंग,
गोल, लांब असतात शिंगं

अंगावर बारीक बारीक केस
खूप दमले की येतो तोंडाला फेस.

बैल करतात शेतात खूप काम,
पोळ्यालाच मिळतो त्यांना आराम.

मालकासाठी सदा कामातच मग्न,
पोळ्यालाच लावतात त्यांचे लग्न.

बैलांची नावं राजा आणि सर्जा,
ढेप घालतो खायला मिळावी म्हणून ऊर्जा.

औत ओढून करतात मेहनत शेतात,
गाऊ या गाणे, त्यांच्या आभारात.

**कु.सरस्वती बापूराव गजमल**
वर्ग–सातवा, जि.प.प्रा.शाळा, रायपूर,
ता. सेलू, जि. परभणी



**कार्तिक शिवहरी व्यवहारे,** वर्ग ७ वा
जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, रुधाना,
तालुका संग्रामपूर, जिल्हा बुलढाणा–४४३४०२.

# पाठलाग

घनश्याम देशमुख
संपर्क ९८२३४१३६२९




दगडू छोट्या खिडकीतून आत शिरला.
ते तिघे हेच पोते घेऊन आले होते.
या खोलीतून आवाज येतोय... इथेच असतील ते तिघे
खोलीत
तिघे तर दिसताहेत पण हा चौथा कोण?
एका कोपऱ्यात
बापरे... चोर तर चार आहेत. आणि त्यांनी एका माणसाला बांधून ठेवलय.
क्रमश:

# ढगांची शाळा

सुनंदा भावसार

उघडली शाळा, मुले झाली गोळा
हसला खडू अन् हसला फळा
ढगसुद्धा म्हणाले, पळा पळा पळा
आपणसुद्धा खेळू, आभाळात शाळा
ढगांना न्यायला, मग आला वारा
वाऱ्याच्या गाडीतून ते चालले भराभरा
ढगांचेच दप्तर अन् मुलंसुद्धा ढगांची
खिदळतात, उसळतात सुरू मस्ती त्यांची
ढगांच्या दप्तरात पाहिलं का कुणी?
पाण्याचेच पुस्तक अन् पुस्तकात पाणी!
चार महिने शाळा, ते गातात पाऊस गाणी
आपण म्हणतो पावसाळ्यात, खूप पडतं पाणी!

संपर्क : ९०९६३४९२४१



इंग्रजी विभाग

# Rainbow

**Archana Sambarkar**

I am the rainbow
The sky is my house
I spread seven colours
Over the mighty clouds.
The Sun is my father
Allows me to roam free
Nature is my mother.
Seven colours seven skies
Seven wonders brighten the eyes
Violet, Indigo, Blue, Green, Yellow
Orange and Red fly in the Bow

**Contact : 7776091309**



Swapnali Amrutkar

# White Hills



Once upon a time, there was a little girl named Rai who lived in a small village called Umangpur. She was six years old and was about to take her first-ever trip to Mumbai with her father, whom she fondly called "Baba". It was Rai's summer vacation, and her father thought it would be an excellent opportunity to show her the bustling city of Mumbai and give her a change of scenery.

As Rai settled into her seat in the train, she looked out of the window and marveled at the new world outside. The journey was enjoyable, and she saw some small and big hills, white in color, which piqued her curiosity. Rai wondered aloud, "How come the hills are so white?" Her father tried to answer her question but was not sure.

As the train reached the last station, Rai noticed that the hills were no longer visible. She remained silent for a while, lost in thought. When her father asked her if she wanted to eat something, she did not respond. It was then that she posed the question that had been on her mind - "Baba, have you seen some white hills or mountains?"



Her father was puzzled and asked where she had seen them. Rai replied, "Before some time, when our train passed near the sea, I saw white color hills or mountains." Her father realized that Rai must have seen the "Mithagar" or salt pan.

He explained to Rai that Mithagar was where salt was produced from seawater through the process of evaporation. He further elaborated that salt farming was done near the sea, and Mumbai had salt farming areas in Palghar, Vasai, Virar, and other places. The largest Mithagar or salt pan in India was in the Runn of Kutch district, which was a part of the western state of Gujarat.

Rai was amazed to learn about salt farming and asked why their village did not have a Mithagar. Her father laughed and explained that their village did not have access to the sea. He also added that salt played a crucial role in maintaining human health and was an essential ingredient in daily cooking, preservation of pickles, food tasting, medicines, manufacturing of soaps, and many other things.


After learning about the importance of salt farming and Mithagar, Rai became excited and expressed her desire to see it. Her father agreed to take her, and Rai thanked him with all her heart.

**Contact : 9960772093**

# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

## Match the picture with its shadow




## Fill in the correct numbers in the magic puzzles


| | | | | |
|---|---|---|---|---|
| | + | 6 | = | 13 |
| + | | + | | + |
| 1 | + | | = | 2 |
| = | | = | | = |
| | + | 7 | = | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | + | | = | |
| + | | + | | + |
| | + | 1 | = | 6 |
| = | | = | | = |
| 10 | + | | = | 14 |

# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

**हे चित्राचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.**



## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.

२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ जुलै २०२३.

३) कोड्याचे उत्तर ऑगस्ट २०२३ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

**Registered** R.N.I.NO. 22679/72

Kishor (Marathi) Postal Regd.No. PCW/076/2021-2023 Registered Newspapers posted at PUNE PSO, GPO- 411 001
The date of publication 26.06.2023 Posting on 27th & 28th June 2023
License to Post without prepayment of postage No. WPP-53











कथा, कविता, कादंबरिका, एकांकिका, दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र, विज्ञान, देश-देशांतर, लोककथा




लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर मासिकातील चाळीस वर्षांतील निवडक साहित्यांवर आधारित 'निवडक किशोर'चे १४ खंड








किंमत प्रत्येकी
₹ ९६३ /-
(३०% सूट)






वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूण किंमत ₹ १६०० /-

किशोर


**If not delivered please return to :**
संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
'बालभारती', सेनापती बापट मार्ग,
पुणे – ४११ ००४.
दूरध्वनी : ०२० – २५७१६२४४
ई–मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,